cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१३९ | शनिवार दि.०८ ऑगस्ट २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# कर्जमाफीचा पहिला हप्ता वितरीत

## ६.२२ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात ५ हजार कोटी जमा, मुख्यमंत्र्यांची माहिती

मुंबई । प्रतिनिधी

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत कर्जमुक्तीची रक्कम अखेर पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वितरित करण्यास सरकारने सुरुवात केली आहे. जवळपास ५ हजार २९ कोटी रुपयांचा पहिला हप्ता ६ लाख २२ हजार २०७ शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये जमा करण्यात आला. ही कर्ज खाती आता निरंक (नील) झाली आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि. ७ ऑगस्ट) दिली.**



### सिबिलची अट शिथील

आधार प्रमाणीकरणाचे काम वेगाने सुरु आहे. ही प्रक्रिया झाल्यानंतर जशी आमच्याकडे खाती येतील त्याप्रमाणे आम्ही खात्यांमध्ये पैसे भरणे सुरु करू. एक महिनाभरातच कर्जमुक्तीची प्रक्रिया होईल. पण जुना अनुभव असा आहे की ८० टक्के काम एका महिन्यात होते आणि २० टक्के कामाला वेळ लागतो. हे लाखो शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचे काम आहे. शेतकऱ्यांना कुठेही सिबिल लागणार नाही. जे जास्तीचे व्याज रद्द केले आहे; ते पूर्ण पैसे सरकार भरत आहे. कोणत्याही शेतकऱ्यावर सिबिलची अट लागणार नाही, असा पुनरुच्चार मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला.

कर्जमुक्ती योजनेच्या अंमलबजावणीचे दोनच टप्पे केलेले आहेत. पहिल्या टप्प्यामध्ये कर्जमाफीचे पैसे भरु आणि दुसऱ्या टप्प्यात प्रोत्साहनपर अनुदानाचे पैसे देऊ, असेही त्यांनी स्पष्ट केले. आषाढी वारी निमित्ताने कर्जमुक्तीची पहिली यादी जाहीर केली होती. ही यादी सर्व ग्रामपंचायतींना पाठवली होती. अगदी सोप्या पद्धतीने शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरण करायचे आहे. त्यासाठी कुठलाही अर्ज भरण्याची गरज नाही. ॲग्रीस्टॅक आणि आधार प्रमाणीकरण प्रक्रिया केल्यानंतर पात्र शेतकऱ्यांची कर्जखाती नील करायचे काम हातामध्ये घेतले आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जशी आमच्याकडे खात्यांची माहिती येईल; त्याप्रमाणे आम्ही पैसे भरणे सुरु करु, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. ▶▶ पान २ वर

# अजित पवारांच्या राष्ट्रवादीतील मतभेद चव्हाट्यावर!

## खा.प्रशांत किशोर–सुनेत्रा पवारांच्या भेटीवर सुनील तटकरेंचा आक्षेप, रणनीतीकारांची गरज नसल्याचे स्पष्टीकरण



मुंबई । प्रतिनिधी

प्रसिद्ध रणनीतीकार प्रशांत किशोर आणि राष्ट्रवादीच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्या भेटीवर राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंनी मोठी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांची ही भेट औपचारिक असावी, पण त्यामध्ये काय चर्चा झाली याची मला माहिती नाही. तसेच आम्ही फिल्डवर काम करणारे कार्यकर्ते आहोत, आठ वेळा अख्खा महाराष्ट्र पालथा घातलाय. त्यामुळे आपल्याला रणनीतीकारांची गरज नाही, असे सांगून सुनील तटकरे यांनी खा.प्रशांत किशोर–सुनेत्रा पवारांच्या भेटीवर आक्षेप घेतल्याचेच स्पष्ट होत आहे. या निमित्ताने अजित पवारांच्या राष्ट्रवादीत वरिष्ठ स्तरावर असलेले ▶▶ पान २ वर

### “ राष्ट्रवादीत लवकरच मोठे बदल, प्रदेशाध्यक्ष बदलणार?

भाजपचा बालेकिल्ला असलेल्या बिहारमधील बांकीपूर या विधानसभा मतदारसंघावर राजकीय रणनितीकार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रशांत किशोर यांनी विजय मिळवला. विजयाच्या तिसऱ्याच दिवशी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांची भेट घेतल्याची माहिती समोर आल्याने आगामी काळात मोठ्या राजकीय घडामोडी घडणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मोठी राजकीय उलथापालथ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. प्रशांत किशोर सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांची मुंबईत सुनेत्रा पवार यांच्या शासकीय निवासस्थानी तब्बल सहा तास बैठक पार पडली. या बैठकीत याविषयी चर्चा झाली. ‘‘भविष्यातील निवडणुकांसाठी आपण काम करण अपेक्षित असेल तर प्रदेशाध्यक्ष पदाबाबत निर्णय घ्यावा लागेल. जोपर्यंत राज्यातील नेतृत्व आमच्यासोबत काम करणार नाही तोपर्यंत आपल्याला राज्यात काम करणे कठीण आहे.’’ असा सल्ला प्रशांत किशोर यांनी बैठकीत दिला असल्याचे बोलले जात आहे.

# जो राजा जनतेला घाबरला, त्याची जाण्याची वेळ आलीय

नवी दिल्ली । वृत्तसंस्था



केंद्र सरकारने सोशल मीडियावरील संवेदनशील पोस्ट किंवा व्हीडीओ यांच्यासंदर्भात एक निर्णय घेतला आहे. संवेदनशील ऑनलाइन मजकूर हटवण्याची मर्यादा ३६ तासांवरून ३ तास केली आहे. १० फेब्रुवारी २०२६ रोजी माहिती तंत्रज्ञान नियम, २०२१ मध्ये केलेल्या संशोधनांच्या आधारे ही अधिसूचना लागू करण्यात आली आहे. मोदी सरकारच्या या नव्या नियमांवर आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी निशाणा साधला आहे. देशातील जनतेचा आवाज दाबण्याचा प्रयत्न कराल तेवढी जनता पेटून उठेल, असा इशारा त्यांनी दिला.

केंद्र सरकारच्या या निर्णयानंतर केजरीवाल यांनी सोशल मीडियावर एक व्हीडीओ शेअर करत मोदी सरकारवर हल्लाबोल केला. ते म्हणाले की, मोदी सरकारने एक नवीन ▶▶ पान २ वर



# जेन-झीला भागवतांच्या प्रमाणपत्राची गरज नाही


## प्रियांका गांधींची कडाडून टीका

दिल्ली । वृत्तसंस्था

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) प्रमुख मोहन भागवत यांनी ‘जनरेशन झेड’च्या (जेन–झी) बाजूने ठाम भूमिका घेतल्यानंतर, काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी वाड्रा यांनी शुक्रवारी त्यांच्या विधानांवर तीव्र शब्दांत टीका केली. देशातील तरुण पिढीला किंवा ‘जनरेशन झेड’ला मोहन भागवत यांच्या कोणत्याही प्रमाणपत्राची गरज नाही, असे सांगत त्यांनी भागवतांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

आरएसएस प्रमुख मोहन भागवत यांनी गुरुवारी ‘जन–झी’चे समर्थन करताना म्हटले होते की, या तरुण पिढीच्या तक्रारी पूर्णपणे रास्त आहेत आणि त्यांच्या प्रामाणिकपणावर आपला पूर्ण विश्वास आहे. तसेच, तरुणांनी केलेली आंदोलने त्यांना ‘राष्ट्रविरोधी’ ठरवत नाहीत, असे स्पष्ट करत लोकशाहीमध्ये आंदोलन ▶▶ पान २ वर

# ओबीसी जागेवर निवडणूक लढवणाऱ्यांना समर्थन नाही-मनोज जरांगे



धाराशिव । प्रतिनिधी

मी राजकारणासाठी नाही, तर माझ्या गरीब मराठ्यांसाठी आरक्षण मागतो; ही माझी जुनीच भूमिका असल्याचे मत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले. त्याचबरोबर कुणबी प्रमाणपत्र घेऊन ओबीसी जागेवर निवडणूक लढणाऱ्यांसाठी माझे समर्थन कधीच नसल्याचे मोठे वक्तव्य देखील मनोज जरांगे पाटील यांनी केले. ते धाराशिवमध्ये बोलत होते.

व्हॅलिडीटी असेल तरच निवडणुकीच्या असल्या कुटाण्यात पडा, मी असेही समाजाला सांगत असतो. पण मी सुरुवातीपासूनच गरीब मराठ्यांसाठी आरक्षणासाठी मागत आलो आहे. त्या मागणीवर मी कायम असल्याचे मत देखील मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले. मी कोणाचा मिंधा नाही महाविकास आघाडी असो नाहीतर महायुती असो माझ्या गरीब मराठा समाजासाठी मी लढतो. मला मित्रत्वाची गरज नाही मला समाजहीत महत्वाचे आहे. समाजाची लेकरबाळ मला अधिकारी ▶▶ पान २ वर

# शिक्षणमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीसांना ‘जेन झी’ आणि काँग्रेस स्वीकारणार नाही-पृथ्वीराज चव्हाण

नवी दिल्ली । वृत्तसंस्था



केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची हकालपट्टी हा ‘सीजेपी’ आणि ‘जेन झी’च्या ऐतिहासिक आंदोलनाचे पहिले यश आहे. पुढे शिक्षणमंत्रिपदासाठी सक्षम राष्ट्रीय चेहरा आवश्यक आहे. मात्र, तसा कोणताही चेहरा केंद्राच्या मंत्रिमंडळात नाही. देवेंद्र फडणवीस यांना दिल्लीत आणण्याच्या चर्चा होत्या मात्र, त्यांनाही ‘जेन झी’ आणि काँग्रेस स्वीकारणार नाही, अशा आशयाचे ट्विट माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केले. यावेळी त्यांनी एकप्रकारे केंद्रातील सर्व मंत्र्यांच्या क्षमतेवर प्रश्न उपस्थित केला. दरम्यान, शिक्षणमंत्रिपदासाठी कॉर्पोरेट क्षेत्रातील नंदन नीलेकणी यांच्या नावाचीही त्यांनी चर्चा केली.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, पंतप्रधानांनी शिक्षण मंत्रालयाचा तात्पुरता कार्यभार प्रल्हाद जोशी यांच्याकडे सोपविला आहे. जोशी यांच्याकडे आधीच तीन मंत्रालयांची जबाबदारी असून, आता चौथ्या मंत्रालयाचीही जबाबदारी आली आहे. ही पावसाळी अधिवेशनापर्यंतची तात्पुरती व्यवस्था आहे. नवे शिक्षणमंत्री राष्ट्रीय स्तरावरील व्यक्तिमत्त्व असावे, त्यांना ‘जेन झी’शी संवाद साधता ▶▶ पान २ वर

# क्रिमी लेयरचे तत्व केवळी ओबीसी, एसईबीसीसाठीच!

## एससी,एसटी आरक्षणाचा यात संबंध नाही, केंद्र सरकारचे सुप्रीम कोर्टात प्रतिज्ञापत्र

दिल्ली । प्रतिनिधी

**केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात एक प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे, ज्यात म्हटले आहे की अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) यांच्या आरक्षणाला क्रिमी लेयरचे तत्त्व लागू होत नाही. सरकारने एससी–एसटी आरक्षणात क्रिमी लेयर तत्त्वाची अंमलबजावणी आणि सरकारी नोकऱ्यांसाठी अधिक न्याय्य आरक्षण धोरणाची मागणी करणाऱ्या जनहित याचिकांना विरोध केला आहे. केंद्र सरकारने म्हटले आहे की, या याचिकांमुळे संविधानांतर्गत कोणत्याही मूलभूत हक्कांचे उल्लंघन होत नाही. शिवाय, विद्यमान कायद्यात एससी आणि एसटी यांना क्रिमी लेयरचे तत्त्व लागू करण्याची तरतूद नाही. सरकारच्या मते, ही संकल्पना केवळ ओबीसी आणि एसईबीसी आरक्षणांना लागू आहे.**



गेल्या वर्षी ११ ऑगस्ट रोजी, सर्वोच्च न्यायालयाने रामाशंकर प्रजापती आणि इतरांनी दाखल केलेल्या जनहित याचिकांवर केंद्र आणि राज्य सरकारांना नोटीस बजावली होती. याचिकेत म्हटले आहे की, जर अनुसूचित जाती–जमाती कुटुंबातील सदस्याने यापूर्वीच घटनात्मक किंवा वरिष्ठ सरकारी पद भूषवले असेल, तर त्यांच्या मुलांना आरक्षणाचे लाभ मिळू नयेत. यामुळे आरक्षणाचे लाभ आर्थिकदृष्ट्या दुर्बळ आणि गरजू लोकांपर्यंत अधिक समानतेने पोहोचतील हे सुनिश्चित होईल. याचिकाकर्त्यांनी अशीही मागणी केली आहे की, आर्थिकदृष्ट्या दुर्बळ घटकांना उप–श्रेण्यांमध्ये निर्माण करून त्यांना प्रवेश आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये प्राधान्य दिले जावे. केंद्र सरकारने म्हटले आहे की, अनुसूचित जाती–जमातींच्या यादीत दुरुस्ती करण्याचा अधिकार केवळ संसदेला आहे. सामाजिक न्याय आणि ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### विनायक राऊत पिता–पुत्रांना अटकपूर्व जामीन

ठाणे : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे माजी खासदार विनायक राऊत, त्यांचे पुत्र गितेश राऊत आणि कुटुंबातील इतर सदस्यांविरोधात दाखल गुन्ह्याप्रकरणी ठाणे सत्र न्यायालयाने शुक्रवारी (दि.७) राऊत पिता–पुत्रांसह सहा जणांना अटकपूर्व जामीन मंजूर केला. त्यामुळे या प्रकरणात त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. माजी खासदार विनायक राऊत यांच्या सून गिरीजा राऊत यांनी त्यांच्यासह कुटुंबातील सदस्यांविरोधात गंभीर आरोप करत कापुरबावडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीच्या आधारे कौटुंबिक हिंसाचार तसेच महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा आणि जादूटोणा प्रतिबंधक कायद्यासह संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या गुन्ह्यात विनायक राऊत, गितेश राऊत यांच्यासह एकूण सात जणांना आरोपी करण्यात आले असून त्यामध्ये दोन कथित भोंदू बाबांचाही समावेश आहे.

### तिसऱ्या मुंबईच्या विकासाला गती मिळणार–मुख्यमंत्री

मुंबई: मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) आणि त्यापलीकडील परिसर हा देशाच्या आर्थिक विकासाचे प्रमुख केंद्र बनण्याची क्षमता असलेला प्रदेश आहे. नीती आयोगाने मुंबई महानगर प्रदेशाच्या विकासातून सुमारे १.५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था निर्माण करण्याची क्षमता व्यक्त केली आहे. या क्षमतेचा प्रभावी उपयोग करून मुंबई महानगर प्रदेशाचा नियोजित, शाश्वत आणि जागतिक दर्जाचा विकास करण्यासाठी राज्य शासनाने आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत भागीदारी करण्यास सुरुवात केली आहे. यातून तिसऱ्या मुंबईच्या विकासाला अधिक गती मिळणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे व्यक्त केला. सह्याद्री अतिथिगृह येथे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत एमएमआरडीए आणि टेमासेक सुरबाना जुरोंग व मॅपलट्री, सिंगापूर यांच्यात सामंजस्य करार करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

### आसाराम बापूचा वैद्यकीय जामीनही फेटाळला

नवी दिल्ली: अल्पवयीन मुलीवरील लैंगिक अत्याचार प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेला स्वयंघोषित धर्मगुरू आसाराम याला वैद्यकीय कारणावरूनही अंतरिम जामीन देण्यास सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी नकार दिला. मात्र, त्याच्या प्रकृतीची काळजी घेण्यासाठी तुरुंगात त्याच्या पसंतीचा प्रशिक्षित सेवक (केअरटेकर) २४ तास ठेवण्याची परवानगी न्यायालयाने दिली आहे. तसेच भविष्यात प्रकृती अधिक खालावल्यास पुन्हा न्यायालयात अर्ज करण्याची मुभाही दिली आहे. न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश आणि पी. बी. वराळे यांच्या खंडपीठाने अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेने सादर केलेल्या वैद्यकीय मंडळाच्या अहवालाचा विचार करून हा निर्णय दिला. ८६ वर्षीय आसारामला अनेक गंभीर आजार असल्याने त्याच्यावर चोवीस तास वैद्यकीय देखरेख ठेवण्याची गरज असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. मात्र, त्याला रुग्णालयात दाखल करण्याची आवश्यकता नसल्याचेही वैद्यकीय मंडळाने स्पष्ट केले. सध्या जोधपूर मध्यवर्ती कारागृहात आसाराम शिक्षा भोगत आहे.

**राज्य लोकतंत्र**

मशिन विभागातील तांत्रिक आढचणीमुळे दैनिक राज्य लोकतंत्रचा अंक ६ पाने ऐवजी चार पाने वितरीत करण्यात आला. या बद्दल नोंद घ्यावी.

–व्यवस्थापक

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०७ ऑगस्ट २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १६४.५० क्विंटल | २,६२० | २,७४५ | २,६७१ |
| ज्वारी/हायब्रिड: ९४.०० क्विंटल | २,५३८ | ३,१०० | २,७८३ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | २,१८० | २,१८० | २,१८० |
| तूर : १.०० क्विंटल | ३,८६० | ४,००० | ३,९३० |
| उडीद : २.०० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ३८.५० क्विंटल | २,४०० | २,८०० | २,६७२ |
| मुग: ४१.५० क्विंटल | ५,८०० | ५,८१२ | ५,८०६ |
| सोयाबीन: ६.०० क्विंटल | ७,००० | ७,००० | ७,००० |
| हरभरा: २.५० क्विंटल | ५,८५६ | ५,८५६ | ५,८५६ |

शेतकऱ्यांना/बेरोजगारांनो जोडधंद्यामधून लखोपती व्हा

विविध महामंडळाचे/जिल्हा उद्योग केंद्र/पशुसंवर्धन/अण्णासाहेब पाटील इत्यादी शासनाचे शेळीपालन/पशुपालन/दुग्ध व्यवसाय/कोंबडी पालन/वराह पालन इत्यादी जोड धंद्यामधून मार्गदर्शन घ्या.

प्रशिक्षण प्रमाणपत्रासाठी फोटो आधारकार्ड, ७५०/–आवश्यक शनिवार, दिनांक ८ ऑगस्ट २०२६ वेळ सकाळी १० ते १ राहील.

ठिकाण : हॉटेल अतिथी, शिवाजी पुतळ्याजवळ, बीड



संपर्क डॉ.वसंत र.मुंडे बी.व्ही.एससी.अँड ए.एच. मो.नं.९४२२५६५३६५

प्रमाणपत्रासाठी ७५० रु.फीस राहील. आधारकार्ड, २ फोटो आवश्यक दि.८ ऑगस्ट २०२६ वेळ सकाळी १० ते १

छत्रपती संभाजी नगर (धुत हॉस्पिटल) येथील सुप्रसिध्द डॉक्टर

आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध

डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे

एम.बी.बी.एस., एम.डी.,
मानसोपचार तज्ञ ( Gold Medalist)
न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट
मो.9518551503 / 9545615352




महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात

सकाळी : १०.०० ते दुपारी २.०० वा.
साई (गवते) कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड, डॉक्टर लाईन, बस स्टॅण्डच्या पाठीमागे,बीड

दुपारी २.३० ते ६.०० वा. डॉ.विश्वास जोशी यांच्या दवाखान्या समोर
प्रगती होमिओ क्लिनिक धोंडीपुरा, टिळक रोड,बीड

खालील आजारांचे निदान व उपचार

- डोकेदुखी / अती चिंता व काळजी
  ➡ (सतत टेन्शन, घाबरटपणा,घाम सुटणे, थरकाप सुटणे, हाता–पायात मुंग्या येणे)
- झोपेच्या समस्या
  ➡ (झोप न येणे, झोपेत चालणे, बडबड करणे, चक्कर येणे, दातखिळी बसणे)
- व्यसनाधिनता : (दारु, तंबाखू, गुटखा, धुम्रपान)
- बालकांच्या समस्या :
  ➡ (झोपेत लघवी करणे, हट्टीपणा, चिडचीडेपणा, अभ्यासात कमी)
- स्मृती भंग (विसरभोळेपणा)
- लैंगिक समस्या
  ➡ (लवकर वीर्य पतन होणे,सेक्सची इच्छा न होणे,कमजोरी,स्वप्नदोष)
- स्क्रिझोफ्रेनिया व इतर मानसिक समस्या



नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क
मो. 8237353737 / 8182839922

सौ.संध्या श्रीराम टेकाळे(शिंदे) मुख्याध्यापिका मो.९४२१३४८४७४

श्रीराम टेकाळे (पुर्व गट शिक्षणाधिकारी, पाटोदा/शिरुर/बीड) सामाजिक कार्यकर्ते मो.9075387638

सौ.डॉ.जयश्री रोहन मालुरे(टेकाळे) M.B.B.S. मो.७७४३९९०९८८ विठाई हॉस्पिटल,कळंब

डॉ.रोहन मालुरे M.B.B.S.,MD,Medicine विठाई हॉस्पिटल,कळंब मो.९८६०५६०५५७

cmyk

cmyk



## अग्रलेख

# वैद्यकीय शिक्षणाची सरमिसळ की आरोग्य व्यवस्थेचा नवा प्रयोग?

महाराष्ट्रातील वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य व्यवस्थेशी संबंधित एका निर्णयामुळे डॉक्टर, वैद्यकीय शिक्षक, विद्यार्थी आणि सार्वजनिक आरोग्य क्षेत्रात व्यापक चर्चा सुरू झाली आहे. होमिओपॅथी पदवीधारकांना अतिरिक्त प्रशिक्षणानंतर आधुनिक वैद्यकातील काही सेवा देण्यासंदर्भातील निर्णयावर अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. या चर्चेकडे ''ॲलोपॅथी विरुद्ध होमिओपॅथी'' अशा वादाच्या चौकटीत पाहणे चुकीचे ठरेल. हा विषय प्रत्यक्षात रुग्णांची सुरक्षितता, वैद्यकीय शिक्षणाची गुणवत्ता, नियामक संस्थांची भूमिका आणि सार्वजनिक धोरणातील पारदर्शकता यांच्याशी संबंधित आहे.

राज्यातील ग्रामीण भागात डॉक्टरांची कमतरता असल्याचे सरकार वारंवार सांगते. अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ग्रामीण रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची तसेच तज्ज्ञ डॉक्टरांची पदे रिक्त असल्याची बाब विविध अधिकृत अहवालांतही अधोरेखित झाली आहे. त्यामुळे आरोग्यसेवा अधिक उपलब्ध करून देण्यासाठी पर्यायी उपाय शोधण्याची गरज नाकारता येणार नाही. मात्र याच ठिकाणी काही मूलभूत प्रश्न निर्माण होतात. हा निर्णय घेण्यापूर्वी राज्य सरकारने कोणत्या तज्ज्ञ समितीचा अभ्यास केला? राष्ट्रीय वैद्यकीय आयोग, राज्यातील वैद्यकीय शिक्षण विभाग, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञ किंवा इतर संबंधित नियामक संस्थांची अधिकृत मते विचारात घेण्यात आली होती का? जर असा अभ्यास आणि सल्लामसलत झाली असेल, तर त्याचे अहवाल सार्वजनिक का करण्यात येत नाहीत? वैद्यकीय शिक्षणातील विविध शाखांची अभ्यासक्रम रचना, प्रशिक्षणाचा कालावधी, क्लिनिकल अनुभव आणि परवाना प्रणाली वेगवेगळी असते. त्यामुळे कोणत्याही शाखेला अतिरिक्त अधिकार देण्याचा निर्णय हा केवळ प्रशासकीय नसून वैज्ञानिक पुराव्यावर आधारित असणे आवश्यक आहे. यामध्ये आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे उत्तरदायित्व. जर विस्तारित अधिकारांच्या चौकटीत उपचारादरम्यान गंभीर वैद्यकीय चूक झाली, तर जबाबदारी कोणाची असेल? उपचार करणाऱ्या डॉक्टरची, प्रशिक्षण संस्थेची की परवानगी देणाऱ्या शासनाची? या संदर्भात स्पष्ट धोरण जाहीर करण्यात आले आहे का? ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील मूळ समस्या डॉक्टरांची कमतरता आहे, हे वास्तव आहे. पण त्यावर दीर्घकालीन उपाय म्हणून रिक्त पदे भरणे, ग्रामीण सेवेसाठी प्रोत्साहन वाढवणे, पायाभूत सुविधा सुधारणे आणि विशेषज्ञ डॉक्टर उपलब्ध करून देणे यालाही तितकेच महत्त्व आहे. त्यामुळे पर्यायी उपाय राबविताना त्यांचे वैज्ञानिक मूल्यमापन आणि संभाव्य परिणाम यांचेही स्पष्ट सादरीकरण आवश्यक ठरते.

या विषयावर मतभेद असू शकतात. काही तज्ज्ञांना हा निर्णय ग्रामीण आरोग्यसेवेसाठी उपयुक्त वाटू शकतो, तर काहीजण रुग्ण सुरक्षेच्या दृष्टीने सावधगिरी बाळगण्याची गरज व्यक्त करतात. अशा परिस्थितीत शासनाने सर्व संबंधित बाजूंचे मत, उपलब्ध वैज्ञानिक पुरावे आणि निर्णयामागील कारणमीमांसा पारदर्शकपणे जनतेसमोर मांडणे ही लोकशाहीतील अपेक्षित प्रक्रिया आहे. आरोग्य क्षेत्रातील कोणताही निर्णय हा विश्वासावर उभा असतो. आणि विश्वास निर्माण होतो तो पारदर्शकता, वैज्ञानिक पुरावे आणि उत्तरदायित्व यांमधून. म्हणून आजचा सर्वात महत्त्वाचा प्रश्न कोणत्या वैद्यकीय शाखेचा नाही. प्रश्न एवढाच आहे, रुग्णांच्या सुरक्षिततेशी संबंधित निर्णय घेताना सरकारने कोणत्या वैज्ञानिक अभ्यासावर आणि कोणत्या तज्ज्ञांच्या शिफारशींवर विश्वास ठेवला? त्या प्रश्नाचे स्पष्ट आणि अधिकृत उत्तर आता जनतेला अपेक्षित आहे.

# कत्तलखान्यातून ५ गौवंशांची सुटका
# चंदनझिरा पोलिसांची धडाकेबाज कारवाई

**जालना । प्रतिनिधी**

चंदनझिराचे पोलीस निरीक्षक श्री किरण बिडवे यांना गुप्त बातमी मिळाली कि, गुलशननगर नॅशनलनगर जालना भागामध्ये गौवंशीय जनावरे आणुन त्यांची अवैधरित्या कत्तल करुन गौ मांस विक्रीला पाठवित आहेत, अशी खात्रीलायक बातमी मिळालेवरुन पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी त्यांचे स्टॉफसह मिळालेल्या बातमीचे ठिकाणी जावुन छापा मारला असता, तेथे पत्र्याचे शेडमध्ये काही इसम गौ वंश जनावरे ताब्यात व कब्जात बाळगुन त्यांची कत्तल करीत असतांना मिळुन आले, त्यावरुन त्यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन एकुण १३६ किलो ग्रॅम वजनाचे गौ मांस जप्त करण्यात आले असुन



तेथे त्यांनी एकुण ०५ गौ वंशीय जनावरे निर्दयतेने निश्चित कालावधी पासुन त्यांचे चारा पाण्याची व्यवस्था न करता दोरीने बांधुन ठेवलेल्या स्थितीमध्ये मिळुन आलेली आहे. त्यांची सुटका करुन त्यांना गौ शाळेमध्ये दाखल करण्यात आलेले आहे.

सदर कारवाईमध्ये अवैधरित्या कत्तलखाना चालवित असतांना खालील आरोपी मिळुन आलेले आहेत - शहानवाज बुढण कुरेशी वय ३६ वर्ष रा. दानाबाजार जालना अरबाज बुढण कुरेशी वय ३० वर्ष रा. दानाबाजार जालना वरील नमुद ०२ आरोपीतांकडुन १,७७,०००/- रुपयांचा मुद्देमाल ज्यामध्ये १३६ किलो गौ मांस आणि कत्तल खान्यातील कत्तलीचे साहीत्य जप्त करण्यात आले असुन तेथील कत्तलीसाठी बांधुन ठेवलेले ०५ लहान मोठे गौवंश जनावरांची सुटका करुन त्यांना गौशाळेत दाखल करण्यात आले असुन त्यांचेविरुध्द गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच त्यांचेविरुध्द प्रचलित कायदयाचे आधाराने पुढील कारवाई करण्यात येणार आहे. सदरची कामगिरी मा. अपर पोलीस अधीक्षक श्री विक्रम साळी, मा. उपविपोअ श्री अनंत कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरण बिडवे, पोउपनि देशमाने, पोउपनि स्कॉट, पोउपनि सैय्यद, मनसुब वेताळ, राजेंद्र ठाकुर, शिवाजी जमधडे, मदन बहुरे, कृष्णा तंगे, अभिजित वायकोस, सागर खैरे, राजु पवार, नवनाथ पाटील, सुधाकर ढाकणे यांचे पथकाने केली आहे.

# जिल्हा परिषदेच्या २० माध्यमिक शिक्षणाचे चार वर्षांनी झाले समायोजन

## सीओ जितीन रहमान यांचे मानले आभार

**बीड। प्रतिनिधी**

**जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षकांच्या २२ अतिरिक्त शिक्षकांचे शुक्रवार दिनांक ७ ऑगस्ट २०२६ रोजी समायोजन आयोजित करण्यात होते. सन २०२२ पासून माध्यमिक शिक्षकाचे विषयनिहाय समायोजन झालेले नव्हते. बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी समायोजन करण्याच्या या निर्णयाचे स्वागत करण्यात आले आहे.**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, उप मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप काकडे, प्राथमिक व विभागाच्या शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, मारुती जाधव, श्रीमती सय्यद अंजुम, सहाय्यक प्रशासन अधिकारी अनंत खेडकर, शिवाजी आदमुडवाड,कनिष्ठ प्रशासन अधिकारी प्रताप जाधव, राहुल जोशी, वरिष्ठ लिपीक विनायक कराड, आदींची उपस्थिती होती. माध्यमिक शिक्षक व शाळा, पाथरकर सुधीर, मा.शा. आवसगाव ता. केज , ढाकणे संजय, मा.शा. चकलांबा, ता. गेवराई , साळवे सुहास, मा.शा. कन्या, गेवराई , राठोड ज्ञानेश्वर, मा.शा. फुलसांगवी, ता. शिरूर, वाघमारे धनंजय, मा.शा येवता ता. केज, सय्यद राणा अप्रिम, मा.शा कन्या गेवराई , चाटे श्यामसुंदर, मा.शा. धारूर , गायकवाड सुनिता, मा.शा. चौसाळा ता. बीड , कांबळे शास्त्री, मा.शा. पोहनेर ता. परळी , बनसोडे प्रवीण, मा.शा. कन्या माजलगाव, आघाव राजेश, मा.शा. फुलसांगवी, ता. शिरूर , बहिर नितीन, मा.शा. चौसाळा ता. बीड., गायकवाड प्रतिभा, मा.शा. पात्रुड ता. माजलगाव., ठोंबरे वशिष्ठ्य, मा.शा. दादेगाव ता. आष्टी. , जायभाय अरुण, मा.शा उमापूर ता. गेवराई., तांदळे संजयकुमार, मा.शा. नाहोली , शेळके विवेकानंद, मा.शा. चकलांबा ता. गेवराई, लहाने शैलेश, मा.शा सुलेमान देवळा ता. आष्टी., कुलथे रेखा जि प माशा चौसाळा , पारखे संतोष, मा.शा. उमापूर ता. गेवराई

# ठिबक सिंचनाच्या अहवालासाठी १७,५०० रुपयांची लाच; उपकृषी अधिकारी एसीबीच्या जाळ्यात

**अंबड । प्रतिनिधी**

एक शेती व शेती साहित्य विक्री दुकानदार यांच्या तक्रारीवरून विश्वनाथ लक्ष्मण गावीत वय ४३ वर्ष, पदः-उप कृषी अधिकारी (सुपरवायझर) तालुका कृषी अधिकारी कार्यालय अंबड, जि. जालना रा. शारदानगर अंबड, दत्तात्रय घोगरे यांचे घरी किरायाने तक्रारदार यांचे गावात नानाजी देशमुख कृषी संजिवनी प्रकल्प योजना शासनाकडून राबविण्यात येत आहे. सदर योजने अंतर्गत तक्रारदार यांचे आई, भाऊ, भावाची पत्नी व स्वतः चे नावे असलेल्या एकून ०४ हेक्टर ०८ आर शेतजमिनीमध्ये ठिबक सिंचन संच बसविण्यासाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालय अंबड येथुन पूर्व संमती मिळालेली आहे. यावरून तक्रारदार यांनी त्यांचा शेतात ठिबक सिंचन संच बसवले व ते ऑनलाइन पोर्टल वर अपलोड केले. जुलै २०२६ मध्ये लोकसेवक विश्वनाथ गावीत यांनी तक्रारदार यांचे शेतात जाऊन तिघांची मोका तपासणी केली परंतु तपासणी अहवाल उपविभागीय कृषी अ३धिकारी कार्यालय कडे ऑनलाइन पाठवला नव्हता. त्यामुळे तक्रारदार यांनी लोकसेवक गावीत यांना फोन करून उर्वरीत एक मोका तपासणी करण्याची व अहवाल ऑनलाइन पाठवण्यबाबत विचारपुस केली असता. लोकसेवक गावीत यांनी तक्रारदार यांचे कडे उर्वरीत मोका तपासणी करून अहवाल उप विभागीय कृषी अधिकारी कार्यालयाकडे पाठवण्या साठी १७,५००/-रु लाचेची मागणी केली अशा आशयाची लेखी तक्रार दि.०६/०८/२०२६ रोजी तक्रारदार यांनी ला.प्र.वी. जालना कडे दिली. दि.०६/०७/२०२६ रोजी अंबड येथील तक्रारदार यांचे मित्र राहुल गाडगे यांचे दुकानात आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडुन १७,५००/- रू पूर्वी ठरल्या प्रमाणे स्वीकारण्यास सहमती दर्शवली. दि.०७.०८.२०२६ रोजी मौजे पाणेगाव ता. अंबड येथील शेतशिवारात श्री आसाराम लक्ष्मणराव आव्हाने यांचे शेतात १७,५००/-रुपये ची लाच रक्कम स्विकारल्यानंतर आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले आहे.- पोलीस ठाणे अंबड येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालू आहे.- आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले असुन गुन्हा दाखल होताच अटक करण्याचे कारवाई रात्री उशिरापर्यंत सुरू होती. श्री. बी. एस. जाधवर, पोलीस उप अधीक्षक जालना, पो.ह. गजानन घायवाट २) मनोहर भुतेकर, ३) संदीप लहाने ४) चालक भालचंद्र बिनोरकर श्रीमती. माधुरी केदार कांगणे मॅडम, पोलीस अधीक्षक, श्री शशिकांत सिंगारे अपर पोलीस अधीक्षक ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर .

## पान ६ वरून...

**सुनेत्राताईंच्या सन्मानासाठी राष्ट्रवादी**

नसून तो आमच्या संस्कारांचा आणि विचारांचा अविभाज्य भाग आहे, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले. राजकारणात वैचारिक मतभेद असू शकतात; मात्र कोणत्याही महिलेबद्दल अशोभनीय किंवा अवमानकारक भाषा वापरणे ही महाराष्ट्राच्या संस्कृतीला शोभणारी बाब नाही. महिलांचा अपमान करणाऱ्या प्रवृत्तींना लोकशाही मार्गाने ठाम उत्तर देण्याची भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने घेतली आहे. आजच्या आंदोलनातून महिलांच्या सन्मानासाठी बीड शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची भूमिका ठामपणे अधोरेखित झाली. महिला नगरसेविका, महिला पदाधिकारी, कार्यकर्त्या तसेच पक्षाचे पदाधिकारी, आजी-माजी नगरसेवक, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मराठा आरक्षणाबाबत निर्णय**

उचलल्यास त्याला तीव्र विरोध केला जाईल, असे सांगत त्यांनी मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील आगामी निवडणुकांमध्ये भाजपला राजकीय फटका बसू शकतो, असा दावा केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंत्र्यांकडून झालेली चूक दुरुस्त करावी, अन्यथा मराठा समाजाचे आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असेही जरांगे पाटील म्हणाले. समाजाच्या हक्कांसाठी कोणत्याही संघर्षाला सामोरे जाण्याची तयारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नार्को चाचणीच्या मुद्द्यावर बोलताना, हा विषय चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी संबंधित नसून, १५ लाख रुपयांची मागणी केल्याचा आरोप असलेल्या अधिकाऱ्यांशी संबंधित असल्याचा दावा त्यांनी केला. संबंधित प्रकरणात सरकारने योग्य ती कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली. यावेळी मराठा समाजाचे कार्यकर्ते आणि विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**आपल्या मुलांच्या भविष्यासाठी**

योग्य तो निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त करण्यात आली.आपल्या मुलांच्या भविष्यासाठी, आपल्या जमातीच्या सन्मानासाठी आणि न्याय हक्कांच्या संरक्षणासाठी १० ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या टाळे ठोको आंदोलनात हजारोंच्या संख्येने सहभागी व्हा, असे आवाहन कोळी राष्ट्रसंघाचे महाराष्ट्र अध्यक्ष बळीराजे वाघमारे यांनी केले.

**बीडकरांना स्वच्छ व नियमित**

बैठकीत निदर्शनास आले. यासाठी १५ व्या वित्त आयोगातून प्राप्त झालेल्या निधीतून थकबाकी अदा करून नवीन योजनेला तातडीने वीज जोडणी देण्याची सूचना करण्यात आली. याशिवाय शहरातील विविध भागांतील पाईपलाईन गळती तातडीने दुरुस्त करण्याचे निर्देश देण्यात आले. गळतीमुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची नासाडी होत असल्याने या कामाला सर्वोच्च प्राधान्य देण्याची आवश्यकता बैठकीत व्यक्त करण्यात आली. यावेळी संदीप क्षीरसागर यांनी बीडकरांना स्वच्छ, नियमित आणि अखंड पाणीपुरवठा मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क असून या विषयात कोणतीही दिरंगाई अथवा हलगर्जी सहन केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले. नागरिकांच्या हितासाठी पाणीपुरवठा व्यवस्था सक्षम करण्यासाठी आवश्यक पाठपुरावा पुढेही सुरू राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**महादेव मुंडे हत्या प्रकरण :**

कारवाई व्हावी, अशी भूमिकाही त्यांनी मांडली. पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी कुटुंबीयांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेत प्रकरणातील तपासाबाबत माहिती घेतली. तसेच तपास प्रक्रियेबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून आवश्यक कार्यवाही केली जाईल, असे त्यांनी सूचित केल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. महादेव मुंडे हत्या प्रकरणातील आरोपींवर तातडीने कारवाई करून कुटुंबाला न्याय मिळावा, अशी मागणी यावेळी पुन्हा करण्यात आली.

**शहरातील नाली बांधकाम**

रुंदीकरणाचा विषय सातत्याने पाठपुरावा करून शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आला आहे.प्रस्तावित चार पदरी घाट रस्त्याचे काम वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या भूसंपादनाबाबत तातडीने सर्वेक्षण करून खाजगी जागेची आवश्यकता किती आहे, याचा सविस्तर प्रस्ताव तयार करून सादर करण्याच्या सूचना आ.प्रकाश सोळंके यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.तसेच माजलगावतेलगाव मार्गावर सातत्याने घडणारे अपघात लक्षात घेता हा रस्ता एमएसआरडीसी मार्फत तातडीने दर्जेदार पद्धतीने विकसित करून सुस्थितीत आणावा व त्यानंतर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्याबाबतही संबंधित अधिकाऱ्यांना आ.प्रकाश सोळंके यांनी निर्देश दिले आहेत.

**मंडल आयोगाच्या अंमलबजावणीमुळे**

आणि माजी आमदार डॉ. नारायणराव मुंडे यांच्या योगदानाचा विशेष उल्लेख करत, मंडल आयोगाच्या अंमलबजावणीमुळे ओबीसी व भटके-विमुक्त समाजाला न्याय मिळाल्याचे सांगितले. सामाजिक न्यायाच्या लढ्यासाठी मंडल स्तंभ प्रेरणादायी केंद्र राहील, असेही त्यांनी नमूद केले. प्रदेश संघटक प्रा. रवींद्र खरात यांनी देशातील पहिला मंडल स्तंभ हा ओबीसी व भटके-विमुक्त समाजाच्या संघर्षाचे प्रतीक असल्याचे सांगितले. दरवर्षी ७ ऑगस्ट हा दिवस मंडल दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. अध्यक्षीय मनोगतात माजी आमदार डॉ. नारायणराव मुंडे यांनी मंडल आयोगाच्या अंमलबजावणीमुळे ओबीसी व भटके - विमुक्त समाजाला सामाजिक न्याय आणि सन्मानाचे हक्क मिळाल्याचे सांगितले. समाजातील वंचित घटकांच्या घटनात्मक अधिकारांच्या संरक्षणासाठी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच केंद्र सरकारच्या समान नागरी कायद्याबाबत त्यांनी आपली भूमिका मांडत, या विषयावर व्यापक जनजागृती व लोकशाही मार्गाने आंदोलन उभारण्याचा निर्धार व्यक्त केला. कार्यक्रमास मंडल स्तंभ स्मारक समितीचे सर्व पदाधिकारी, सदस्य तसेच दोदडगाव व पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दरगुडे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांनी मानले.

## पान १ वरून...

**कर्जमाफीचा पहिला**

प्रत्यक्षात कर्जाची रक्कम अधिक असताना शेतकऱ्यांच्या नावासमोर मंजूर झालेली रक्कम कमी दिसत असल्याचा गैरसमज निर्माण झाला होता. हे एनपीएवर लावलेले व्याज होते. त्या व्याजामुळे कर्जाची रक्कम जास्त दिसत होती. ते व्याज बँकांनी रद्द केल्यामुळे आता कर्जाचे पैसे आणि शासनाने त्यांच्या खात्यात भरलेले पैसे हे सारखेच आहेत. यामुळे ही खाती आता निरंक झाली आहेत. आता रोज मोठ्या प्रमाणात खात्यांची माहिती येत आहे. जसजशी खाती येतील, त्याप्रमाणे त्या खात्यांमध्ये पैसे जमा होतील. अजूनही जवळपास १८ ते १९ लाख खाती असून, त्यांची प्रक्रिया सुरु असल्याचे त्यांनी नमूद केले. १२ लाख कर्जखात्यांबाबत तांत्रिक त्रुटी आढळून आलेल्या आहेत. काही ठिकाणी खाती दुबार आली आहेत. यामुळे दोन की एक खाते आहे हे पाहावे लागेल. काही ठिकाणी नंबर, नावे जुळत नाहीत. ही सुधारणा करण्यासाठी १२ लाख खात्यांची यादी बँकांना परत पाठवली आहे. कारण बँकांनी त्यात चुका केल्या आहेत. बँकांनी सांगितले आहे की आठवडाभरामध्ये त्यात सुधारणा करुन आम्ही परत पाठवू. सर्व खात्यांमध्ये पैसे जमा करण्यास सुरुवात झालेली आहे. पुढच्या काळामध्ये जेवढे आधार प्रमाणीकरण होईल; त्या सगळ्या खात्यांमध्ये पैसे टाकून आपल्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा पूर्ण लाभ मिळेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

--------

**जो राजा जनतेला घाबरला, त्याची**

कायदा आणला आहे. आता मोदी सरकार इन्स्टाग्राम, फेसबुक किंवा इतर कोणतेही माध्यमांवरील एखादा व्हीडीओ किंवा पोस्ट डिलीट करण्यास सांगेल, तेव्हा त्या प्लॅटफॉर्मला तो मजकूर अवघ्या ३ तासांच्या आत काढावा लागेल. हा नवीन कायदा आणला आहे. म्हणजे जर तुम्ही मोदींच्या, सरकारच्या किंवा पेपरफुटी विरोधात काहीही बोललात तर ३ तासातच तुमचा मजकूर सोशल मीडियावरून हटवला जाईल. पण जर या सरकारने मुलींबद्दल आक्षेपार्ह टिप्पणी केली किंवा गुंडगिरी केली तर सरकार ते डिलीट करणार नाही, असा खोचक टोला केजरीवाल यांनी लगावला. पुढे ते म्हणाले की, मोदींना या देशातील लोकांची, युवकांची, तरुणींची भीती वाटू लागली आहे, म्हणून ते असे करतायत. जंतरमंतरवरील आंदोलनानंतर सरकार आणखीनच घाबरले आहे. पण या भीतीवर लोकांचे आवाज दाबणे हा उपाय नाही. गेल्या १० वर्षात मोदींनी जनतेचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला. आणि जंतरमंतरवर लोकांच्या रागाचा उद्रेक झाला. आता मोदींनी चांगली कामे करणे अपेक्षित आहे. मात्र, जर तुम्ही जनतेचा आवजच दाबण्याचा प्रयत्न केला तर जनता शांत बसणार नाही. जो राजा जनतेला घाबरतो त्याची जाण्याची वेळ जवळ येते, असा इशारा अरविंद केजरीवाल यांनी दिला.

--------------

**अजित पवारांच्या राष्ट्रवादीतील**

मतभेद चव्हाट्यावर आल्याचे दिसत आहे. बिहारमध्ये मोठा विजय मिळाल्यानंतर प्रशांत किशोर यांनी सुनेत्रा पवार यांची भेट घेतली. त्यामध्ये झालेल्या चर्चांमध्ये सुनील तटकरेंच्या कार्यशैलीवर काही प्रश्न उपस्थित करण्यात आल्याची माहिती समोर आली. याच मुद्द्यावर बोलताना सुनील तटकरेंनी प्रतिक्रिया दिली. सुनील तटकरे म्हणाले की, ''प्रशांत किशोर आणि सुनेत्रा पवार यांची भेट झाल्याची माहिती मिळाली. त्यांची ती औपचारिक भेट होती. त्यांची काय चर्चा झाली याबाबत मला माहिती नाही. आम्ही प्रॅक्टिकल आहोत. पवार साहेब, अजितदादा आणि इतर नेत्यांसोबत मी काम केले आहे. मी माझ्या आयुष्यात निवडणुकीचा सर्व्हे कधीही केला नाही. मला काय असल्या रणनीतीकार किंवा सर्व्हेची गरज नाही. मी फिल्डमध्ये काम करणारा आहे. गावातल्या लोकांना, तरुणाईला भेटल्यानंतर मला अंदाज येतो. मी आठवेळा महाराष्ट्र उलथापालथा केला आहे. राज्याचा कानाकोपरा मला माहिती आहे. चांद्यापासून बांद्यापासून मी माहिती सांगू शकतो.'' ते रणनीतीकार असतील, पण ते आमच्या पक्षासाठी काम करतात की नाही याची मला माहिती नाही. प्रशांत किशोर यांची नेमणूक झाली असती तर त्याची माहिती मला असती, असे सुनील तटकरे म्हणाले. आम्ही पक्षाचे संघटन बांधत असताना जनतेला, शेतकऱ्यांना, उद्योजकांना नेमके काय पाहिजे याची माहिती आहे. त्यात कुणाचा सल्ला मिळाला तर तो ठीक आहे, असे तटकरे म्हणाले. प्रशांत किशोर यांनी सुनेत्रा पवार यांची भेट घेतल्याच्या घटनेवर प्रतिक्रिया देताना सुनील तटकरे म्हणाले की, ''सदिच्छा भेट झाली म्हणजे त्यांची पक्षाच्या सल्लागारपदी नेमणूक झाली असे समजण्याचे काही कारण नाही. भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली आम्ही एनडीएमध्ये आहोत. दादांच्या निधनानंतर जे जे प्रश्न उपस्थित झाले त्यावर आम्ही तेच सांगतोय, आम्ही एनडीएमध्ये आहोत. प्रशांत किशोर हे भाजपच्या विरोधात निवडून आले ती त्यांची भूमिका आहे.'' सुनील तटकरे पुढे म्हणाले की, ''२०१४ साली आम्ही स्वतंत्र निवडणूक लढत होतो. त्यावेळी आमच्यावर अनेक आरोप झाले होते. त्यावेळी आम्हाला चांगल्या जागा मिळाल्या. त्यानंतर २०१९ सालीही आम्हाला चांगल्या जागा मिळाल्या. सर्व्हे करणे काही चुकीचं आहे असं नाही. पण आम्ही सगळे प्रॅक्टिकल असल्याने आम्हाला चांगला अंदाज आहे. मला माझं राजकीय गोत्र माहिती आहे. आम्हाला या सगळ्या गोष्टी कळतात.''

------------------

**ओबीसी जागेवर निवडणूक लढवणाऱ्यांना**

करायचेत असेही जरांगे पाटील म्हणाले. मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा एकनाथ शिंदेंवर हल्ला चढवला. तुम्ही प्रमाणपत्र रद्द केले तर मला मित्रत्वाची गरज नाही, मला समाज महत्त्वाचा असल्याचे सांगत जरांगेंनी हल्ला चढवला. आम्ही तुमची स्तुती केली म्हणून तुम्ही प्रमाणपत्र रद्द करता, आमच्या पोराचे मुडदे पडावेत का? असा सवाल करत तुम्ही मुडदे पाडणार असाल तर मला मित्रापेक्षा माझा समाज महत्त्वाचा आहे असे जरांगे म्हणाले. समाजालाही अपेक्षा आहेत असे म्हणत मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा एकनाथ शिंदेंवर निशाणा साधला. मनोज जरांगे पाटील यांनी प्रसाद लाड यांचे कौतुक केले आहे. लाड यांना वाटते की समाजाचे कल्याण व्हावें, प्रसाद लाड किती मरमर करणार? समोरच्यांनीही त्यांना रिस्पॉन्स द्यायला हवा. प्रसाद लाड यांच्या मित्रालाही अक्कल यायला हवी. बिगर मिशीचा म्हणत प्रवीण दरेकर यांना मनोज जरांगे यांनी टोला लगावला. तर प्रसाद लाड यांच्यावर टीका करणाऱ्यांना आम्ही मोजत नाहीत, आम्ही त्यांना कोलतो असे म्हणत नाव न घेता लक्ष्मण हाके यांच्यावर देखील जरांगेंनी हल्लाबोल केला. दरम्यान प्रमाणपत्र रद्द करण्याचा डाव मी कधीही यशस्वी होऊ देणार नसल्याचे जरांगे म्हणाले.

--------------

**शिक्षणमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीसांना 'जेन झी'**

यावा, ढासळलेली शिक्षणव्यवस्था सुधारता यावी आणि शिक्षणासाठी अधिक निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा चव्हाण यांनी व्यक्त केली. मात्र, सध्याच्या केंद्रीय मंत्रिमंडळात अशी व्यक्ती दिसत नसल्याचेही त्यांनी म्हटले. चव्हाण म्हणाले की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री फडणवीस यांना दिल्लीला आणून शिक्षणमंत्रिपद देण्याची चर्चा आहे. मात्र, २०२६च्या नीट पेपरफुटी प्रकरणात महाराष्ट्रातील काही कोचिंग संस्था आणि पेपर तयार करणाऱ्यांवर आरोप झाले असून, फडणवीस हे राज्याचे गृहमंत्रीही आहेत. त्यामुळे 'जेन झी' आणि काँग्रेस त्यांना स्वीकारणार नाही. शिक्षणतज्ज्ञ, प्रशासकीय अधिकारी किंवा माजी कुलगुरूचा शिक्षणमंत्रिपदासाठी विचार होऊ शकतो. मात्र, उच्च शिक्षण व्यवस्थेत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या निष्ठावान व्यक्तींच्या नियुक्त्या झाल्या असून त्यातील बहुतांश जण प्रभावी नसल्याची टीकाही त्यांनी केली. त्यानंतर कॉर्पोरेट क्षेत्रातील व्यक्तीचा विचार करता येईल, असे सांगत त्यांनी 'नंदन नीलेकणी?' असा सवाल उपस्थित केला.

---------

**जेन-झीला भागवतांच्या**

हा संवादाचा एक वैध मार्ग असून त्याचा उद्देश फूट पाडण्याऐवजी एकमत घडवून आणणे हा असावा, अशी भूमिका त्यांनी मांडली होती. परीक्षांच्या प्रश्नपत्रिका फुटल्याच्या मुद्द्यावरून एका नवीन दबाव गटाने अलीकडेच केलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर त्यांचे हे भाष्य अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. भागवत यांच्या या वक्तव्यावर प्रतिक्रिया विचारली असता, संसद भवन परिसरात पत्रकारांशी बोलताना प्रियांका गांधी म्हणाल्या की, देशातील तरुणांना मोहन भागवत जी यांच्या प्रमाणपत्राची अजिबात गरज नाही. याचवेळी त्यांनी केंद्र सरकारवर आणि विशेषतः केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. अमित शहा घाबरलेले आहेत आणि म्हणूनच ते संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये येत नाहीत, असा आरोप त्यांनी केला. त्यांनी सभागृहात येऊन निवेदन द्यावे, यात अडचण काय आहे? जर काहीतरी चुकीचे घडले आहे, तर सरकारने त्याची नैतिक जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणी त्यांनी केली. २० जुलै रोजी प्रश्नपत्रिका फुटीच्या मुद्द्यावरून शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर पोलिसांनी केलेल्या कथित अत्याचारांच्या पार्श्वभूमीवर त्यांनी हे वक्तव्य केले.

-----------------

**क्रिमी लेयरचे तत्व केवळी ओबीसी,**

सक्षमीकरण मंत्रालयाने म्हटले आहे की, अनुसूचित जाती आणि जमातींच्या यादीत कोणतेही बदल केवळ संसदच करू शकते. घटनेच्या कलम ३४१ आणि ३४२ नुसार, कोणत्याही जाती किंवा जमातीचा यादीत समावेश करण्याचा किंवा वगळण्याचा अधिकार केवळ संसदेला आहे. केंद्र सरकारने असेही म्हटले आहे की, ही याचिका प्रस्थापित कायद्याकडे दुर्लक्ष करते. इंदिरा साहनी (मंडल आयोग) प्रकरणाचा संदर्भ देत सरकारने म्हटले आहे की, अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीयांची ओळख केवळ आर्थिक स्थितीवर नव्हे, तर ऐतिहासिक, सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणाच्या आधारावर केली जाते. सरकारने म्हटले आहे की कल्याणकारी योजनांना उत्पन्न मर्यादा आधीपासूनच लागू आहेत. केंद्र सरकारने म्हटले आहे की अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या प्रवर्गातील बहुतांश कल्याणकारी योजनांमध्ये उत्पन्न मर्यादा आधीपासूनच लागू आहेत, ज्यामुळे गरजूंपर्यंत लाभ पोहोचेल याची खात्री होते. सरकारने असेही म्हटले आहे की याचिकाकर्त्यांनी कोणत्या योजनांमध्ये बदल करणे आवश्यक आहे आणि या बदलांमुळे दारिद्र्यरेषेखालील (बीपीएल) लोकांना कसा फायदा होईल, हे स्पष्ट केले नाही.


जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**

**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१००१**

**दिनांक - ०७/०८/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती **राजेंद्र रावसाहेब सावळे** रा. पानेगाव ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या **मुलाच्या** जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | राहुल राजेंद्र सावळे | मुलगा | ०५/१२/२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०७/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**


cmyk


दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि. ०८ ऑगस्ट २०२६
३



**माजलगाव:– सौ.प्रतीक्षा नितीन काळे यांची सांडस चिंचोली ता. माजलगाव च्या अंगणवाडी सेविका म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांचा माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने सपत्नीक सत्कार करताना बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे, बहुजन विकास मोर्चाचे तालुकाध्यक्ष प्रदीप पट्टेकर सर्व अधिकारी कर्मचारी बांधव**

## बाराव्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रख्यात लेखिका इंदुमती जोंधळे

अंबाजोगाई । प्रतिनिधी



डिसेंबर महिन्यात छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी होणाऱ्या १२ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सिद्धहस्त लेखिका इंदुमती जोंधळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

मराठवाडा साहित्य परिषद, शाखा – अंबाजोगाईच्या कार्यकारिणी बैठकीत ही निवड सर्वानुमते करण्यात आली. स्वागताध्यक्ष म्हणून शकुंतलाताई लोमटे यांची या पुर्वीच निवड करण्यात आली आहे.

प्रख्यात लेखिका इंदुमती जोंधळे ह्या आंबाजोगाई जवळ असलेल्या मोरवड यां गावात जन्मलेल्या होत. त्यांचे पती जेष्ठ संपादक, लेखक महावीर जोंधळे ह आंबाजोगासीचे. इंदुमती जोंधळे यांचे बिनपटाची चौकट (आत्मकथन), अस्वस्थ श्वासांची डायरी व पाषाणनिद्रा (कथासंग्रह ), फुलझडी (नाटक), इत्यादी साहित्य प्रकाशित असून बेदखल या कथासंग्रहास महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार प्राप्त झालेला आहे. त्यांनी दीर्घ काळ शिक्षकहणून नोकरीं केली. संभाजीनगर येथील सरस्वती भुवन विद्यालयात मुख्याध्यापक म्हणून त्या निवृत्त झाल्या.

**अध्यक्ष निवडीची पद्धत**

पूर्वाध्यक्ष नूतन अध्यक्षाचे नाव सुचवतात. त्यांनी सुचवलेल्या नावाचा बंद लिफाफा मसाप शाखा, अंबाजोगाईच्या कार्यकारिणीच्या बैठकीत उघडला जातो. त्या नावावर कार्यकारिणीचे एकमत झाले तरच ते नाव जाहीर केले जाते. एखाद्याने जरी विरोध दर्शविला तर मात्र निवडणूक घेऊन अध्यक्ष ठरवला जातो. या निवडणूकीत मसापचे अंबाजोगाई येथील आजीव सभासद व पहिले शंभर स्वागत सभासद मतदान करू शकतात. आतापर्यंत कधीच मतदानाची वेळ आली नाही. यावेळी पूर्वाध्यक्ष बालाजी सुतार यांनी इंदुमती जोंधळे यांचे नाव सुचवले त्यावर कार्यकारिणीचे एकमत झाले.

१२ व्या अंबाजोगाई सा. संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस मसाप अंबाजोगाईचे अध्यक्ष.डॉ. राहुल धाकडे, जेष्ठ मार्गदर्शक अमर हबीब, केंद्रीय सदस्य दगडू लोमटे, उपाध्यक्ष प्रा. शैलजा बरुरे, सचिव गोरख शेंद्रे, सहसचिव भागवत मसने, कोषाध्यक्ष मंजुषा कुलकर्णी, सदस्य अनिरुद चौसाळकर, संतोष मोहिते, प्रा सतीश घाडगे व तिलोत्तमा पतकराव हे उपस्थित होते.

११ संमेलनाध्यक्षाचा वारसा

अंबाजोगाई मसाप शाखेचे वतीने दर दोन वर्षानी अंबाजोगाई साहित्य संमेलन घेण्यात येते. या संमेलनाचे पूर्वाध्यक्ष क्रमवार खालीलप्रमाणे आहेत – प्रा.रंगनाथ तिवारी, प्राचार्य डॉ. शैला लोहिया, प्रा. रा.द. आरगडे, बलभीम तरकसे, प्राचार्य डॉ. संतोष मुळावकर, डॉ. श्रीहरी नागरगोजे, मंदाताई देशमुख, गणपत व्यास, प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे, प्रा. डॉ. दासू वैद्य व बालाजी सुतार. इंदुमती जोंधळे या तिसऱ्या महिला संमेलनाध्यक्ष आहेत.

# क्रांतीसुर्य अण्णासाहेब जावळे पाटील मराठवाडा आर्थिक विकास महामंडळाच्या स्थापनेची मागणी

बीड । प्रतिनिधी

आज रोजी बीड येथे अ. भा. छावा संघटनेचे मराठवाडा विभागीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या बैठकीमध्ये अ. भा. छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे पाटील तसेच क्रांतीसुर्य स्व.अण्णासाहेब जावळे पाटील यांचे चिरंजीव दादासाहेब जावळे पाटील उपस्थित होते.

आजच्या या बैठकीमध्ये अ. भा. छावा संघटनेच्या मराठवाडा विभागीय पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या यात सर्वप्रथम बीड जिल्हाध्यक्ष म्हणून अशोक अण्णा रोमन यांची बीड जिल्हाध्यक्ष म्हणून फेरनिवड करण्यात आली तसेच यावेळी संपूर्ण मराठवाडा विभागातील सर्व जिल्ह्यातील जिल्हाध्यक्षांच्या निवडी करण्यात आल्या यामध्ये छत्रपती संभाजी नगर जिल्ह्याचे



**बीड येथे अ. भा. छावा संघटनेची विभागीय बैठक संपन्न**

जिल्हाध्यक्ष म्हणून अशोक मोरे पाटील तसेच परभणीचे जिल्हाध्यक्ष म्हणून छत्रपती शिंदे पाटील लातूरचे जिल्हाध्यक्ष दीपक नरवडे पाटील नांदेड चे जिल्हाध्यक्ष माधवराव ताटे धाराशिव चे जिल्हाध्यक्ष कालिदास गायकवाड व जालना जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष म्हणून संदीप ताडगे यांची निवड करण्यात आली या सर्व जिल्हाध्यक्षांच्या निवडी स्वतः क्रांतीसुर्य स्वर्गीय अण्णासाहेब जावळे पाटील यांचे चिरंजीव दादासाहेब जावळे पाटील व प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे पाटील यांच्या हस्ते करण्यात आल्या तसेच आजच्या बैठकीमध्ये क्रांतीसुर्य अण्णासाहेब जावळे पाटील मराठवाडा आर्थिक विकास महामंडळाच्या स्थापने संदर्भात सर्वानुमते मागणी करण्यात आली बैठक चालू असताना मराठा संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी या बैठकीला सदिच्छा भेट देऊन सर्व नवीन कार्यकारणीस शुभेच्छा दिल्या व क्रांतीसुर्य स्वर्गीयअण्णासाहेब जावळे पाटील यांच्या संघर्षमय जुन्या आठवणींना उजाळा देऊन त्यांच्या आदर्शावर सर्व समाजाने चालण्याचे आवाहन केलेआजच्या बैठकीला मराठवाड्यातून हजारोंच्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच महिला पदाधिकारी उपस्थित होत्या ही बैठक यशस्वी संपन्न करण्यासाठी अ.भा.छावा बीड जिल्हाध्यक्ष अशोक अण्णा रोमन यांच्यासोबत बीड मधील सर्व सहकाऱ्यांनी मेहनत घेतली होती.

# सराफा व्यावसायिकाला अडवून लुटणारी टोळी निष्पन्न; ६.९३ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

बीड / पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेल्या एका खळबळजनक दरोड्याच्या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही दिवसांत यशस्वी पर्दाफाश केला आहे. भरदिवसा दुचाकीवरून जाणाऱ्या सोनार व्यावसायिकाला अडवून सोन्या-चांदीचे दागिने लुटणाऱ्या टोळीतील एका मुख्य आरोपीस पोलिसांनी बेड्या ठोकल्या असून, त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेली कार व ६ लाख ९३ हजार रुपयांहून अधिकचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक २ ऑगस्ट २०२६ रोजी फिर्यादी श्री. रमेश उदावंत (वय ४७ वर्षे, व्यवसाय सोनार, रा. हिवरसिंगा, ता. व जि. बीड) हे निर्गुडी येथील आठवडी बाजारासाठी सोन्या-चांदीचे दागिने घेऊन आपल्या मोटारसायकलने हिवरसिंगा येथून जात होते. सकाळी सुमारे ९:३० वाजण्याच्या सुमारास निर्गुडी-हिवरसिंगा रोडवर पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कारमधून आलेल्या अज्ञात इसमांनी त्यांची मोटारसायकल अडवली आणि जबरदस्तीने त्यांच्या जवळील सोन्या-चांदीचे दागिने लुटून नेले. या प्रकरणी पाटोदा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९(३), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तांत्रिक विश्लेषणातून आरोपी जेरबंद



सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कांवत यांनी स्थानिक गुन्हे शाखेला समांतर तपासाचे आदेश दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण, गोपनीय बातमीदार आणि खबऱ्यांच्या सहाय्याने कसून तपास केला. तपासादरम्यान गुन्ह्यातील आरोपी रोहन ऊर्फ बॉबी संजय गुणवंत (वय २४ वर्षे, रा. शास्त्रीनगर, नाळवंडी नाका, बीड) यास ताब्यात घेण्यात आले. कसून चौकशी केली असता त्याने सदर गुन्ह्याची कबुली दिली.

६.९३ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

आरोपीकडून गुन्ह्यात वापरण्यात आलेली स्विफ्ट कार (क्र. चक-१२ गच्-४३००) तसेच चोरीस गेलेला ऐवज असा एकूण ६,९३,८००/- (सहा लाख त्र्याण्ण हजार आठशे रुपये) किमतीचा मुद्देमाल हस्तगत करून जप्त करण्यात आला आहे. गुन्ह्यातील इतर फरार आरोपींचा शोध सुरू असून त्यांनाही लवकरच अटक करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

सदर धडक कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कांवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. विश्वजित खुळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक शेखर औटे, पोह अशोक दुबाले, पोह सोमनाथ गायकवाड, पोह बाळासाहेब सानप, पोह मारुती कांबळे, पोह आसेफ शेख, पोअ अश्विनकुमार सुरवसे व चापोअ सिद्धेश्वर मांजरे यांनी केली आहे.

# जिल्हा माहिती अधिकारी यांच्या तक्रारीची चौकशी होणार

## प्रचंड सोळुंके यांच्या निवेदनाची उपसंचालकांनी घेतली दखल; उपोषण स्थगित



**बीड । प्रतिनिधी**

**बीडचे जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर यांच्या कथित नियमबाह्य कामकाजाच्या विरोधात साप्ताहिक 'बीड नेता'चे संपादक प्रचंड सोळंके यांनी आक्रमक भूमिका घेतली होती. दैठणकर यांच्यावर उच्चस्तरीय चौकशी करून कठोर कारवाई करावी, तसेच १३ ऑगस्ट २०२६ रोजी आझाद मैदानावर उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला होता. या निवेदनाची दखल उपसंचालक, माहिती व जनसंपर्क यांनी घेतली असून, आपल्या स्तरावर असणाऱ्या जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर यांच्या तक्रारीची चौकशी करू असे आश्वासन दिले. व सोळुंके यांना उपोषण मागे घेण्याची विनंती करण्यात आली त्यानुसार सोळंके यांनी आपले उपोषण स्थगित केले आहे.**

छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय माहिती कार्यालयाचे उपसंचालक (माहिती) प्रवीण टाके यांनी संपादक प्रचंड सोळंके यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली. निवेदनाद्वारे करण्यात आलेल्या तक्रारींची चौकशी करून कारवाई करण्यात येईल असे सांगितले. यासाठी वेळ देण्याची विनंती करत १३ ऑगस्टपासून प्रस्तावित उपोषण मागे घ्यावे, असे आवाहन केले आहे. संपादक प्रचंड सोळंके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे २६ मे २०२६ रोजी आणि त्यानंतर स्मरणपत्र देऊन जिल्हा माहिती कार्यालयाच्या कार्यपद्धतीवर गंभीर आक्षेप घेतले होते. शासनाच्या जाहिरात वाटपात नियमांचे उल्लंघन करणे, निकष पूर्ण न करणाऱ्या वृत्तपत्रांना जाहिराती देणे, पात्र वृत्तपत्रांवर अन्याय करणे आणि जाहिरात पडताळणीच्या नावाखाली पत्रकार व संपादकांना आर्थिक त्रास देणे, आर्थिक मागणी करणे असे गंभीर आरोप निवेदनात करण्यात आले होते. तसेच या काळातील सर्व आर्थिक व्यवहारांची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणीही लावून धरण्यात आली होती. या घडामोडींमुळे प्रचंड सोळुंके यांनी उपस्थित केलेल्या तक्रारींची शासन स्तरावर दखल घेतल्याचे स्पष्ट झाले असून, आता या प्रकरणात प्रशासन कोणती भूमिका घेते आणि पुढील कार्यवाही काय होते, याकडे लक्ष लागले आहे.

### सक्तीच्या रजेवर पाठवून चौकशीचे आदेश

संपादक प्रचंड सोळंके यांनी दिलेल्या इशाऱ्यानंतर आणि प्रकरणाची व्याप्ती पाहता, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय कार्यालयाने तातडीने हालचाली केल्या आहेत. त्यानुसार, जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यांच्यावरील आरोपांची निष्पक्ष चौकशी करण्यात येणार असल्याची माहिती महासंचालक कार्यालयाकडून देण्यात आली आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत ते रजेवरच राहणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

# युसूफवडगांव येथील अतिक्रमणग्रस्त रस्त्याची अधिकाऱ्यांकडून पाहणी

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव ते शिंदेवाडी या रस्त्यावरील अतिक्रमणाची संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. या रस्त्यावर झालेल्या अतिक्रमणामुळे वाहतुकीस मोठा अडथळा निर्माण होत असून नागरिक आणि शेतकऱ्यांना गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याची तक्रार करण्यात आली होती.

युसूफवडगांव ते शिंदेवाडी हा रस्ता मूळतः ३३ फूट रुंदीचा असून, सध्या अनेक ठिकाणी त्याची रुंदी केवळ ७ ते ८ फूट इतकी उरल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे. गेल्या काही वर्षांपासून केज रोडपासून शिंदेवाडी रस्त्यापर्यंत काही शेतकऱ्यांनी रस्त्यावर अतिक्रमण केल्यामुळे शासनाच्या रस्त्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.



सुमारे दोन ते अडीच किलोमीटरच्या अंतरात दोन्ही बाजूंनी अंदाजे १२ ते १२ फूट अतिक्रमण झाल्याचा दावा करण्यात आला आहे. काही ठिकाणी जनावरांचे कोठे उभारण्यात आले आहेत, तर काही ठिकाणी लाकडी कुंपण, मोठे दगड, मातीचा भराव तसेच शेतीची मशागत रस्त्याच्या हद्दीत करण्यात आल्याचे पाहणीत निदर्शनास आले. एका ठिकाणी शेताच्या बाजूने चर खोदून त्यातील मातीचा भराव रस्त्यावर टाकण्यात आल्याने वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याचेही ग्रामस्थांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित शेतकऱ्यांना वारंवार सूचना देऊनही अतिक्रमण काढण्यात आले नाही. त्यामुळे शिंदेवाडी येथील शेतकऱ्यांनी केज तहसीलदारांकडे तक्रार करून रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्याची मागणी केली होती. त्यानंतर तहसीलदारांनी अतिक्रमण हटविण्यासाठी आवश्यक कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. त्या अनुषंगाने संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी युसूफवडगांव येथे भेट देऊन रस्त्याची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी विकास जाधव,बाबु शिंदे,प्रदीप निकम,जयराज निशिगंध,शत्रुघ्न निकम,संपत निकम यांच्यासह स्थानिक शेतकरी, ग्रामस्थ तसेच संबंधित विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. पाहणीनंतर रस्त्याच्या मूळ हद्दीची मोजणी करून अतिक्रमणाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# आत्मा अंतर्गत उत्कृष्ट शेतकरी पुरस्कारासाठी अर्जास मुदतवाढ

बीड । प्रतिनिधी

कृषी विभागाच्या आत्मा () योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या वर्षासाठी तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय उत्कृष्ट शेतकरी पुरस्कारासाठी इच्छुक शेतकऱ्यांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. पुरेसे प्रस्ताव प्राप्त न झाल्याने अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली असल्याची माहिती प्रकल्प संचालक (आत्मा) सुभाष साळवे यांनी दिली.

या पुरस्काराचा उद्देश कृषी क्षेत्रातील नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा अवलंब, विविध कृषी उपक्रमांतील उल्लेखनीय कामगिरी, उत्पादनवाढ तसेच इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करणे हा आहे. तालुकास्तरीय उत्कृष्ट शेतकरी पुरस्कारासाठी ₹१०,०००, तर जिल्हास्तरीय पुरस्कारासाठी ₹२५,००० इतके पारितोषिक देण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यासाठी ५ जिल्हास्तरीय व २२ तालुकास्तरीय पुरस्कार निश्चित करण्यात आले आहेत. अनुसूचित जाती (), अनुसूचित जमाती () तसेच महिला शेतकऱ्यांना प्राधान्य दिले जाणार असून, यापूर्वी शासनाचा पुरस्कार प्राप्त झालेल्या शेतकऱ्यांना या पुरस्कारासाठी पात्रता राहणार नाही. इच्छुक शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह विहित नमुन्यातील अर्ज संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयात १५ ऑगस्ट २०२६ पर्यंत सादर करावेत. तालुकास्तरीय छाननीनंतर जिल्हास्तरीय समिती अंतिम निवड करणार असून, निवड झालेल्या उत्कृष्ट शेतकऱ्यांचा सन्मान पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

# दु:ख-वेदना घेऊन आले... विश्वास आणि नवजीवन घेऊन परतले!

## मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिरातून हजारो रुग्णांना दिलासा; आष्टीत जनसेवेचा आरोग्य महायज्ञ







(छाया : सचिन रानडे)

आष्टी । प्रतिनिधी

आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून वंचित राहणाऱ्या हजारो गरजू रुग्णांसाठी आष्टी येथे आयोजित करण्यात आलेले मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिर आशेचा किरण ठरले. आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश आण्णा धस यांच्या पुढाकारातून आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या महाशिबिरात हजारो नागरिकांनी विविध आजारांची मोफत तपासणी करून तज्ज्ञ डॉक्टरांकडून उपचार व मार्गदर्शन घेतले.

शेती, रोजगार आणि संसाराच्या जबाबदाऱ्यांमध्ये स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना या शिबिरामुळे मोठा आधार मिळाला. अनेक रुग्ण वर्षानुवर्षे आजाराचे दुःख मनात ठेवून जगत होते. मात्र या शिबिरात त्यांना मोफत तपासण्या, तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला, औषधोपचार आणि पुढील उपचारांची दिशा मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा आशेचे हास्य फुलले.

शस्त्रक्रियेची चिंता, उपचारांच्या खर्चाची धास्ती आणि भविष्यातील अनिश्चितता घेऊन आलेले अनेक रुग्ण उपचारानंतर नव्या विश्वासाने घरी परतले. केवळ औषधोपचारच नव्हे, तर ''आपण एकटे नाही'' हा विश्वासही या शिबिरातून त्यांना मिळाल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. महाआरोग्य शिबिराला आष्टीसह परिसरातील विविध तालुक्यांतील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मोठ्या संख्येने झालेली उपस्थिती हा उपक्रमावरील जनतेच्या विश्वासाचा पुरावा ठरला. ग्रामीण भागात अशा आरोग्यसेवेची किती मोठी गरज आहे, हेही या शिबिरातून अधोरेखित झाले. आमदार सुरेश आण्णा धस यांनी यापूर्वीही मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून अनेक गरजू रुग्णांना मदत केली आहे. कोरोनाकाळातील जनसेवा, सामाजिक उपक्रम आणि आरोग्यविषयक प्रश्नांबाबत घेतलेली भूमिका यामुळे त्यांची जनसामान्यांप्रती असलेली बांधिलकी पुन्हा अधोरेखित झाली आहे.

एवढ्या मोठ्या उपक्रमात काही किरकोळ उणिवा राहिल्या असल्या तरी त्या दूर करून भविष्यात अधिक व्यापक स्वरूपात आरोग्यसेवा जनतेपर्यंत पोहोचविण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला. गोरगरीबांच्या वेदनांवर फुंकर घालणारा आणि समाजात माणुसकीचा संदेश देणारा हा आरोग्य महायज्ञ जनतेच्या मनात कायमचा घर करून गेला आहे.



## पत्रकार सोमनाथ खताळ यांचा वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देऊन सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा लोकमत कार्यालय येथे लोकमतचे जिल्हा प्रतिनिधी तथा ज्येष्ठ पत्रकार सोमनाथ खताळ यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी खताळ यांना वाढदिवसानिमित्त भेटून शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख बीड चंद्रकांत आप्पा नवले, पत्रकार दिनेश लिंबेकर, भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष तथा नाथापूरचे सरपंच सुंदर मदनराव चव्हाण, माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गवळी, डॉ. दिनेश ढेंगे, मच्छिंद्र साठे, युवा पत्रकार अंकुश गवळी, आकाश गायवळ आदी उपस्थित होते. उपस्थितांनी पत्रकार सोमनाथ खताळ यांना निरोगी, दीर्घायुषी आणि यशस्वी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शनिवार दि.८ ऑगस्ट २०२६
४

# बियाणांसंदर्भात महाबीजने घेतला मोठा निर्णय

## पेरलेले सोयाबीन न उगवल्याच्या राज्यात साडेआठशे शेतकऱ्यांच्या तक्रारी


पुणे : विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांकडून महाबीजच्या सोयाबीन बियाण्यांच्या उगवणक्षमतेबाबत तब्बल ८४४ हून अधिक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. यानंतर महाबीजने अर्थातच महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळाने मोठा निर्णय घेतला आहे. महाबीजच्या न उगवलेल्या सोयाबीन बियाणांसंदर्भात महाबीजने चौकशी समिती नेमली आहे. याप्रकरणी अंतर्गत चौकशी सुरू केली आहे.

याआधी शेतकऱ्यांच्या बांधावर पंचनामे झाले आहेत. या प्राथमिक उगवणक्षमता चाचणी अहवालात कमी पावसात पेरणी झाल्याने बऱ्याच भागात सोयाबीन उगवण्यावर परिणाम झाल्याचे निदर्शनास आल्याचे महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी यांचं म्हणणं आहे. दुसरीकडे शेतकऱ्यांच्या तक्रारीवरून सुरु असलेल्या चौकशीत बियाणे उत्पादनादरम्यान विहित प्रमाणित कार्यपद्धतींचे पालन केले गेले होते का, याची तपासणी केली जाईल आणि काही त्रुटी आढळल्यास निश्चितचं निदर्शनास आणल्या जातील. जर पालन केले नसेल, त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा यावेळी




महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक दिलीप स्वामी यांनी दिला आहे. महाबीज सोयाबीन उगवणक्षमतेबाबत शेतकऱ्यांच्या अधिक प्राप्त तक्रारी राज्यात मराठवाडा विभागातील आहेत. कमी पावसात सोयाबीन पेरणी केल्यामुळे बियाणे उगवणीवर परिणाम झाल्याचे बोलले जात आहे. ७५ ते १०० मि.मी. पावसाअभावीचं अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीन पेरणी केल्याचे निदर्शनास. दुसरे कारण, ३ ते ५ सें.मी. खोली पेक्षा अधिक खोली पेरणी केल्याने सोयाबीन उगवण क्षमतेवर परिणाम. तसंच काही ठिकाणी वाटप केलेल्या सोयाबीन बियाणे संदर्भात ०.२९ टक्के सोयाबीन बियाणेमध्ये संशयता आहे. याची तपासणी सुरू आहे. तपासणी अखेर त्रुट्या आढळल्यास निदर्शनास आणल्या जाईल. सोयाबीन बियाण्याची उगवण न होणे किंवा अत्यल्प उगवण होणे या समस्येने शेतकरी हैराण झाले आहेत. काही वेळा तर संपूर्ण शेत दुबार पेरणीच्या संकटात सापडते, ज्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. या समस्येमागे एकच नव्हे, तर अनेक कारणे एकत्रितपणे कार्यरत असतात. बीजामधील जिवंत भ्रूण अनुकूल परिस्थितीत पाणी, ऑक्सिजन आणि योग्य तापमान मिळाल्यानंतर सक्रिय होऊन नवीन रोप तयार करण्याची प्रक्रिया म्हणजे बीज उगवण होय. सोयाबीन बियाण्यासाठी ८ ते १० टक्के आर्द्रता सर्वांत योग्य मानली जाते. आर्द्रता वाढल्यास श्वसनक्रिया वाढते, तापमान वाढते, बुरशी वाढते, ऊर्जा वाया जाते, १० टक्क्यांपेक्षा जास्त आर्द्रतेवर बीजाचा ऱ्हास जलद सुरू होतो.

## राष्ट्रीयीकृत बँकांतील कर्जाबाबतचा संभ्रम दूर, सहकारमंत्र्यांची माहिती



मुंबई / प्रतिनिधी

कर्जमुक्तीची रक्कम दोन दिवसांत बँकेत जमा होईल. ज्यांची ॲग्रीस्टॅक नोंदणी झाली त्यांना पैसे जमा होतील. पण शेतकऱ्यांनी गडबड करु नये. कारण ५६ लाख सर्व पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्ती मिळेल, असा पुनरुच्चार राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी केला. राष्ट्रीयीकृत बँकेसंदर्भात काही संभ्रम होता. याबाबत सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे आणि सहकार आयुक्त तावरे यांनी बँकेतील व्यवस्थापकांसोबत वैयक्तिक बैठक घेऊन चर्चा केली असून या कामाने आता गती घेतली आहे, अशीही माहिती त्यांनी दिली. तांत्रिक अडचणीमुळे कर्जमाफीची रक्कम वितरित करण्यास अडचण येत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. कर्जमाफीच्या अंमलबजावणीदरम्यान बँकांकडून हेअर कटला (विशेष तडजोड सवलत) मान्यता नसल्याने संभ्रम निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून राष्ट्रीयीकृत बँकांना या विशेष सवलतीला संमती देण्यास सांगण्यात आले आहे. अनुत्पादित (एनपीए) कर्जखात्यांबाबत सरकारकडून बँकांना 'हेअर कट' सवलत देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच १ एप्रिल २०२६ नंतर पात्र कर्जखात्यांवर कोणतीही व्याज आकारणी करु नये, असेही निर्देशही सर्व बँकांना देण्यात आले आहेत. कर्जमाफी योजनेचा लाभ पात्र शेतकऱ्यांना वेळेत मिळावा यासाठी आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप ॲग्रीस्टॅक नोंदणी केलेली नाही, अशा शेतकऱ्यांनी तत्काळ नोंदणी करुन आधार प्रमाणीकरण करावे, असे आवाहन सहकारमंत्र्यांनी केले आहे.

ॲग्रीस्टॅक व आधार प्रमाणीकरण प्रक्रिया

ॲग्रीस्टॅक नोंदणी करा. आवश्यक माहिती व कागदपत्रे अपलोड करा. आधार क्रमांक लिंक करुन प्रमाणीकरण पूर्ण करा. प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळेल.


## जमिनीच्या गुणधर्मानुसार खतांची योग्य निवड करण्याची पद्धत

पिकाच्या लागवडीपूर्वी खत देताना जसा पिकाच्या शिफारसीचा विचार केला जातो. तितकाच विचार जमिनीच्या गुणधर्माचा व्हावा लागतो. जमिनीच्या गुणधर्मात जमिनीचा सामू, जमिनीचा पोत, जमिनीची घडण कशाप्रकारची आहे, जमिनीत ओलावा किती आहे, तो किती काळ टिकतो. या सर्वांचा विचार करुन खत व्यवस्थापन केल्यास केवळ उत्पादनात वाढ होत नाही तर जमिनीचेही आरोग्य राखते जाते.

जमिनीचा सामू : जमिनीचा सामू म्हणजे जमीन आम्लधर्मी आहे की विम्लधर्मी हे दर्शवणारा निर्देशांक होय. साधारणपणे ६ ते ८ दरम्यान असलेल्या जमिनीत बहुतांश अन्नद्रव्ये पिकांना सहज उपलब्ध होतात. ज्या जमिनीचा सामू ६.५ पेक्षा कमी असतो अशा आम्लधर्मी जमिनीत कॅल्शियम अमोनियम नायट्रेट आणि रॉक फॉस्फेट या खतांचा चांगला परिणाम दिसून येतो. ज्या जमिनीचा सामू ७.३ पेक्षा जास्त असतो अशा विम्लधर्मी म्हणजेच (चोपण) जमिनीत युरिया, अमोनियम सल्फेट, सिंगल सुपर फॉस्फेट आणि सल्फेट ऑफ पोटॅश या खतांचा चांगला प्रतिसाद मिळतो. कोकणातील अतिआम्ल (५.५ पेक्षा कमी सामू) जमिनीत चुना शेणखतामध्ये मिसळून द्यावा. तर चोपण जमिनीत जिप्सम शेणखतामध्ये मिसळून वापरल्यास जमिनीची सुधारणा होते आणि खतांची कार्यक्षमता वाढते.

जमिनीचा पोत : जमिनीचा पोत हलका किंवा भारी असल्याने खत व्यवस्थापन बदलते.

हलक्या जमिनीत पाणी लवकर झिरपत असल्याने नत्र आणि पालाशयुक्त खते विभागून द्यावीत. युरिया ५:१ प्रमाणात निंबोळी पेंडीसोबत वापरला तर नत्राचा अपव्यय कमी होतो. हलक्या जमिनीत सिंगल सुपर फॉस्फेट आणि अमोनियम सल्फेट या खतांना चांगला प्रतिसाद मिळतो. भारी जमिनीत संयुक्त नायट्रोफॉस्फेट खते भारीत पोताच्या जमिनीसाठी अधिक प्रभावी




ठरतात.

जमिनीची घडण : जमिनीची घडण चांगली असल्यास अन्नद्रव्ये टिकून राहतात. हलक्या जमिनीत जशा नदीकाठी किंवा कोकणातील हलक्या पोताच्या जमिनींसाठी शेणखत, कंपोस्ट किंवा हिरवळीची खते वापरावीत यामुळे मातीची पाणी धरुन ठेवण्याची क्षमता वाढते. भात खाचरात चिखलणीच्या वेळी हेक्टरी ५ टन गिरीपुष्पाचा पाला मिसळल्यास फायदा होतो. सेंद्रिय खतांमुळे रासायनिक खतांचा निचऱ्यामुळे होणारा अपव्यय कमी होतो.

जमिनीतील ओलावा : खतांमधील अन्नद्रव्ये पिकांना उपलब्ध होण्यासाठी जमिनीत पुरेसा ओलावा आवश्यक असतो. कोरडवाहू शेतीत पेरणीच्या वेळी खते खोलवर पेरावीत, त्यामुळे ओलाव्याच्या मदतीने अन्नद्रव्ये उपलब्ध होतात. जमिनीत सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण जास्त असल्यास ओलावा जास्त काळ टिकतो आणि अन्नद्रव्यांची उपलब्धता सुधारते. योग्य खत व्यवस्थापनासाठी माती परीक्षण करून जमिनीच्या गुणधर्मांनुसार खतांचा वापर केल्यास उत्पादन वाढते आणि खतांचा खर्चही कमी होतो, असा सल्ला धुळ्याच्या कृषि विज्ञान केंद्रातील मृदा विज्ञान विषय विशेषज्ञ, डॉ. अतिश पाटील यांनी दिला.

## कोंबड्या कमी अंडी देत असल्यास करा हे उपाय!

मुक्त कोंबडीपालन पद्धतीमध्ये अंड्याचे किमान ४०% आणि कमाल ६५% उत्पादन मिळणे अपेक्षित आहे. म्हणजे १०० कोंबड्यामागे कमीत कमी ४० अंडी मिळायला हवीत तरच व्यावसायिक स्वरूपात हा धंदा परवडतो. परंतु काही कारणांमुळे बऱ्याचदा अंडी उत्पादन अपेक्षेप्रमाणे मिळत नाही.

कोंबड्यांत कमी अंडी उत्पादनांचे कारणे आणि त्यावरील उपाय : कोंबड्या या त्या त्या वयाच्या कळपामध्ये राहणे पसंत करतात. मोठ्या कोंबड्या लहान पिलाना पिल्लांना चोच मारुन जखमी करतात किंवा पाठीवरील पिसे उपसतात. संघर्षामुळे कोंबड्यांच्या शरीरावर ताण येतो त्यामुळे अंडी उत्पादन कमी होते. म्हणून शक्यतो एकाच वयाच्या कोंबड्यांचा किंवा पिल्लांचा कळप असावा. वेगवेगळ्या वयाच्या कोंबड्यांना एकत्र मिसळू नये. पोल्ट्रीफार्म जवळ कुत्र्यांचे भुंकणे, मांजराचे ओरडणे, हिंस्र प्राण्यांचा वावर, वाहनांचा आवाज, गोठ्यात अनोळखी व्यक्तीचा प्रवेश यामुळे कोंबड्यांवर ताण येवून अंडी उत्पादनावर परिणाम होतो यासाठी पोल्ट्रीफार्म मुख्य रस्त्या पासून सुरक्षित दूर अंतरावर असावे, जेणेकरून आवाजाचा कमी त्रास होईल. विशेषतः अंड्यांवरील कोंबड्यांना त्रास होऊ नये याची विशेष काळजी घ्यावी. उन्हाळ्यात तापमान वाढीमुळे अंडी उत्पादन घटते. अशावेळी कोंबड्याना थंड पाण्याचा पुरवठा करावा, तसेच ताण कमी करण्याची औषधे द्यावीत, शेड मधे हवा खेळती ठेवावी. राहण्यासाठी अपुरी जागा असेल तर आजार लवकर पसरतात. प्रति पक्षी किमान ४ ते ५ वर्ग फुट जागा असावी. मुक्त पद्धत असेल तर रात्रीच्या निवाऱ्यासाठी किमान २ वर्ग फुट जागा प्रति पक्षी उपलब्ध करून द्यावी. लसिकरण करताना कोंबड्यांच्या शरीरावर ताण येतो आणि अंडी उत्पादन कमी होते. लस दिल्यानंतर नेहमी कोंबड्याना ताण कमी करणारी औषधे आणि लिवर टॉनिक्स द्यावीत. आजार पसरल्यास अंडी



उत्पादनावर वाईट परिणाम होतो. त्यामुळे वरचेवर कोंबड्याना जंत नाशक औषध द्यावीत, लीटर हे नेहमी स्वच्छ आणि कोरडे ठेवावे. त्यात १०% चुना मिक्स करावा. कोंबडी ही नेहमी अंधाऱ्या आणि एकांत असणाऱ्या सुरक्षित जागी अंडी देणे पसंत करते. त्या दृष्टीने प्रति ६ ते ८ पक्षी एक अंडी देण्याचे खोके/नेस्ट बॉक्स ठेवावे. अंडयावरील कोंबड्यांना सतत स्वच्छ, निर्जंतुक आणि मुबलक पाणी पिण्यास द्यावे. पाण्याची भांडी ही वारंवार स्वच्छ करावीत. शक्यतो पाणी स्वच्छ सुती कपड्याने गाळून घ्यावे. तसेच पाण्यात ई कोलाई किंवा सालमोनेला या आजारांच्या विषाणूंचा प्रादुर्भाव होऊ नये याची काळजी घ्यावी. कोंबड्यांना संतुलित आहार दिला नाही तर अंडी उत्पादनावर परिणाम होतो. अंडी उत्पादन सुरु होताच म्हणजे २० ते २२ आठवडे वय असताना कोंबड्याना उच्च प्रथिने (१६%) आणि ऊर्जा युक्त संतुलित आहार पुरवावा. मुक्त पद्धत असेल तर नैसर्गिक कीडे, मुंगी, गवत आणि इतर नैसर्गिक आहार यांच्या व्यतिरिक्त प्रति पक्षी किमान ८० ते ९० ग्रॅम संतुलित आहार द्यावा. कोंबड्यांना आहारातून योग्य खनिजांचा पुरवठा न झाल्यास कमी अंडी उत्पादन, कवच विरहित अंड, कमकुवत कवच असणारी व लगेच फुटणारी अंडी देणे या समस्या उद्भवतात. अंडी देणाऱ्या कोंबड्यांना संतुलित आहारा सोबत किमान ५% अतिरिक्त कॅल्शिअम द्यावे. बाजारात उपलब्ध असलेली खनिज मिश्रण/कॅल्शिअम कार्बोनेटचा किंवा शिंपल्याचा चुरा तसेच पाण्यात मिसळलेला कळीचा चुना देखील कॅल्शिअमचा चांगला पर्याय आहे. कोंबड्याना उच्च अंडी उत्पादन देण्याच्या दृष्टीने योग्य प्रमाणात प्रकाश उपलब्ध असणे अत्यंत गरजेचे आहे. अंडयावर आलेल्या कोंबड्यांना दिवसातील किमान १६ तास सलग प्रकाश दिसायला हवा. यादृष्टीने दिवसा नैसर्गिक सूर्यप्रकाश किती तास असतो याचा अभ्यास करून कृत्रिम प्रकाश पुरवावा लागतो. म्हणजे १२ तास सूर्य प्रकाश असेल तर ४ तास कृत्रिम प्रकाश पुरवावा. त्या प्रकाशाची तीव्रता शेडमध्ये सहज वर्तमानपत्र वाचता येईल एवढीच असावी. पोल्ट्रीफार्म धारकांनी फार्म वर दिवसातून किमान ३ ते ४ वेळा अंडी गोळा करावीत. अंडी लवकर गोळा न केल्यास केव्हा तरी अपघाताने अंडे फुटते आणि कोंबड्याना अंडे खायची सवय लागते, ही विकृति वाढल्यास कोंबड्या स्वतः ची अंडी फोडून खायला सुरुवात करतात. साहजिकच अंडी उत्पादन घटते. अंडयावरील कोंबडी ही वजनाने हलकी असावी. अती वजन वाढल्यास अंडी उत्पादनावर वाईट परिणाम होतो. त्यादृष्टीने कोंबड्या अंडयावर येताना म्हणजे २० व्या आठवड्यात १२०० ते १३०० ग्रॅम वजन असावे. आणि सरासरी कोंबडीचे वजन १५०० ग्रॅम असावे. त्यापेक्षा जास्त वजन झाले तर अंडी उत्पादन कमी होऊ शकते. त्यामुळे कोंबड्यांच्या वजनाकडे आणि आहाराकडे बारीक़ लक्ष द्यावे. वयाच्या ७२ आठवड्यापर्यंत कोंबड्या उच्च अंडी उत्पादन देतात. त्यानंतर मात्र त्या मौल्टिंग अवस्थेत म्हणजेच अंगावरील पिसे गळून पडून त्याजागी नवीन पिसे येतात. यासाठी २ ते अडीच महीने जातात या काळात अंडी उत्पादन खूपच कमी होते. नर सतत माद्यांच्या मागे लागून कळपात ताण निर्माण करतात. साधारण १०० पिल्लांमधे किमान ३० ते ४० टक्के नर तयार होतात त्यामुळे अतिरिक्त नर योग्य वेळीच कमी करणे केव्हाही फायद्याचे असते. प्रति ८ ते १० मादी एक नर ठेवावा. खुडूक कोंबड्या अंडी देत नाहीत आणि नेस्ट बॉक्स मधील जागा मात्र अडवून ठेवतात. अशा कोंबड्याना अंडी उत्पादनासाठी प्रोत्साहित करावे किंवा त्यांचा वापर घरच्या घरी पिल्लू निर्मितिसाठी करावा.

## दिन विशेष

### जागतिक दिवस:
### भारत छोडो दिवस, भारतीय ग्रंथालय दिन
### आंतरराष्ट्रीय भूमिपूत्र दिन

### महत्वाच्या घटना

११७३ : पिसाच्या मनोर्याचे बांधकाम सुरू झाले. हा मनोरा बांधण्यास २०० वर्षे लागली आणि चुकीने तो तिरका बांधला गेला.
१८९२ : थॉमस एडिसन यांना दुहेरी तार यंत्राचे पटेंट मिळाले.
१९२५ : चंद्रशेखर आझाद आणि त्यांच्या सहकार्यांनी काकोरी रेल्वेस्थानकावर सरकारी खजिना लुटला.
१९४२ : 'चले जाव' चा नारा दिल्याबद्दल महात्मा गांधींना अटक करण्यात आली.
१९४५ : अमेरिकेने जपानच्या नागासाकी शहरावर 'फॅटबॉय' हा अणूबॉम्ब टाकला. यात ३९,००० लोक तत्क्षणी म्रुत्यूमुखी पडले तर हजारो लोकांना पुढील अनेक वर्षे किरणोत्सर्गाचे परिणाम भोगावे लागले. प्रथम हिरोशिमा व नंतर नागासाकी या शहरांवर टाकलेल्या अणूबॉम्बमुळे जपानने शरणागती पत्करली आणि दुसरे महायुद्ध संपुष्टात आले.
१९६५ : मलेशियातुन बाहेर काढल्यामुळे सिंगापूर हा देश स्वतंत्र झाला. आपल्या इच्छेविरुद्ध स्वतंत्र झालेला हा जगातील एकमेव देश आहे.
१९७४ : वॉटरगेट प्रकरण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी राजीनामा दिला.
१९९३ : छोडो भारत चळवळीच्या सुवर्णजयंती सांगतासमारंभानिमित्ताने 'सरहद गांधी' खान अब्दुल गफार खान यांच्या टपाल तिकिटाचे प्रकाशन
१९९३ : छोडो भारत चळवळीच्या सुवर्णजयंती सांगतासमारंभानिमित्ताने 'सरहद गांधी' खान अब्दुल गफार खान यांच्या टपाल तिकिटाचे प्रकाशन
१९७५ : पंतप्रधानांच्या विरुध्द कोर्टात जाण्यास मनाई करणारे विधेयक संसदेत मंजूर करण्यात आले. या वेळी बरेच विरोधी पक्षनेते तुरुंगात होते.
१९९३ : छोडो भारत चळवळीच्या सुवर्णजयंती सांगतासमारंभानिमित्ताने 'सरहद गांधी' खान अब्दुल गफार खान यांच्या टपाल तिकिटाचे प्रकाशन
१९९६ : पद्मभूषण व पद्मश्री पुरस्कार तसचं, भारतरत्न पुरस्कार सन्मानित जगप्रसिद्ध भारतीय क्रिकेटपटू मास्टर ब्लास्टर सचिन तेंडूलकर यांची भारतीय क्रिकेट संघाच्या कर्णधार पदी नियुक्ती करण्यात आली.
२००० : भाभा अणूसंशोधन केन्द्राचे संचालक डॉ. अनिल काकोडकर यांना दिल्ली येथील 'इन्स्टिट्युट ऑफ इंडस्ट्रियल रिसर्च' या संस्थेचा सुवर्णमहोत्सवी गौरव पुरस्कार जाहीर
२००५ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाचे डिस्कव्हरी हे मानवरहित अंतराळ यान चौदा दिवसांच्या साहसी आणि धोकादायक प्रवासानंतर कॅलिफोर्नियास्थित एअरबेसवर सुरक्षितपणे उतरले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६३१ : इंग्लंड देशांतील पहिले कवी पुरस्कार विजेते इंग्रज कवी, साहित्यिक समीक्षक, अनुवादक आणि नाटककार जॉन ड्राइडन यांचा जन्मदिन.
१७५४ : पिअर चार्ल्स एल्फांट वॉशिंग्टन शहराचे रचनाकार फ्रेन्च अमेरिकन वास्तुविशारद आणि स्थापत्य अभियंता (मृत्यू: १४ जून १८२५)
१७७६ : ॲमेडीओ ॲव्होगॅड्रो इटालियन रसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: ९ जुलै १८५६)
१८७६ : ब्रिटीश कालीन भारतातील बंगाल प्रांताचे गव्हर्नर लॉर्ड लिटन द्वितीय ( –, २) यांचा जन्मदिन.
१८९० : 'संगीतसूर्य' केशवराव भोसले 'संगीत सौभद्र' मधील धैर्यधराच्या भूमिकेत गाजलेले गायक अभिनेते. 'हाच मुलाचा बाप', 'सन्याशाच्या मुलगा' या नाटकांतील त्यांच्या भूमिका गाजल्या. त्यांनी स्थापन केलेल्या ललितकलादर्श संगीत नाटक मंडळींतर्फे 'सौभद्र', 'शारदा', 'राक्षसी महत्त्वाकांक्षा' इ. अनेक नाटके रंगभूमीवर आली. (मृत्यू: ४ आक्टोबर १९२१)
१८९१ : सयुक्त प्रांताचे माजी राज्यपाल फ्रान्सिस वर्नर वाईली यांचा जन्मदिन.
१८९३ : पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय हिंदी कादंबरीकार, संपादक आणि गद्य लेखक शिवपूजन सहाय यांचा जन्मदिन.
१९०९ : डॉ. विनायक कृष्ण गोकाक ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कन्नड साहित्यिक, शिक्षणतज्ञ व इंग्रजी वाड्मयाचे गाढे अभ्यासक (मृत्यू: २८ एप्रिल १९९२)
१९२० : कृ. ब. निकुम्ब 'घाल घाल पिंगा वार्या, माझ्या परसात' या कवितेमुळे परिचित असलेले भावकवी. त्यांचे अनेक कवितासंग्रह व 'सायसाखर' हे खंडकाव्य प्रसिद्ध आहे. (मृत्यू:)
१९३३ : साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय हिंदी लेखक, पत्रकार आणि पटकथा लेखक व कादंबरीकार मनोहर श्याम जोशी यांचा जन्मदिन.
१९३७ : मॉरिशस येथील पसिद्ध भारतीय हिंदी साहित्यकार अभिमन्यू अनंत यांचा जन्मदिन.
१९७५ : भारतीय अभिनेते आणि निर्माते महेश बाबू यांचा जन्म.
१९९१ : हंसिका मोटवानी अभिनेत्री व मॉडेल

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०१ : विष्णूदास अमृत भावे मराठी रंगभुमीचे जनक, त्यांची पन्नासहून अधिक नाट्याख्याने 'नाट्यकवितासंग्रह' या नावाने प्रसिद्ध झाली आहेत. (जन्म: ? ? १८१९)
१९४८ : हुगो बॉस कानी चे संस्थापक हुगो बॉस यांचे निधन. (जन्म: ८ जुलै १८८५)
१९६२ : नोबल पारितोषिक पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध जर्मन स्विस कवी, कादंबरीकार आणि चित्रकार हर्मन कार्ल हेसे यांचे निधन.
१९७० : ब्रिटीश कालीन भारतात तीस वर्ष तुरुंगवास भोगणारे प्रख्यात भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ते व राजकारणी त्रिलोकनाथ चक्रवर्ती यांचे निधन.
१९७६ : जान निसार अख्तर ऊर्दू शायर व गीतकार (जन्म: १४ फेब्रुवारी १९१४)
१९९६ : जेट इंजिन चे शोधक फ्रँक व्हाटलेट यांचे निधन. (जन्म: १ जुन १९०७)
२००२ : शांताबाई दाणी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायी (जन्म: १ जानेवारी १९१८)
२०१५ : भारतीय पत्रकार, लेखक, आणि कवी काययार सिंहनाथ राय यांचे निधन. (जन्म: ८ जून १९१५)

# विद्यार्थिनीच्या धाडसामुळे अपहरणाचा प्रयत्न फसला

## अंबड मध्ये विद्यार्थिनीचा सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

जालना । प्रतिनिधी

पोलीस प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे अंबड शहरांमध्ये शैक्षणिक शिक्षण घेणारे मुलीचा सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आल्याचे दिसून येत आहे. अंबड शहरात अनेक शैक्षणिक संस्था असल्याने दररोज हजारो विद्यार्थी-विद्यार्थिनी ये-जा करतात. बसस्थानक, पाचोड नाका, पोलिस कॉलनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसर, म्हाडा कॉलनी आदी भागांत महिलांच्या सुरक्षिततेबाबत नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे.महिला व मुलींना त्रास देणाऱ्या प्रवृत्तींवर कठोर कारवाई करण्यासाठी पोलिसांनी गस्त वाढविण्यासह 'दामिनी पथक' अधिक सक्रिय करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. आठवीतील विद्यार्थिनीचे भरदिवसा अपहरण करण्याचा अज्ञात तिघांनी प्रयत्न केला. दरम्यान विद्यार्थिनीने दाखविलेल्या प्रसंगावधान व धाडसामुळे हा अपहरणाचा डाव फसला.या घटनेनंतर अंबड पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून संशयितांचा शोध सुरू आहे.या कथित घटनेने पालकांमध्ये मात्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



या संदर्भात सांगण्यात आलेल्या माहितीनुसार, आरती ज्ञानेश्वर माळी ही विद्यार्थीनी मूळची गेवराई तालुक्यातील असून शिक्षणासाठी ती अंबड येथे आपल्या मावशीकडे सुरंगे नगर परिसरात राहते. सध्या ती मत्स्योदरी विद्यालयात आठवीत शिक्षण घेत आहे. दरम्यान आज मंगळवारी सकाळी सुमारे ९ वाजता ती सातवीचे बोनाफाईड प्रमाणपत्र घेण्यासाठी वैद्यराज शाळेत गेली होती. तेथून परत येत असताना जालना रोड परिसरात तिच्या जवळ एक नंबरप्लेट स्पष्ट न दिसणारे चारचाकी वाहन येऊन थांबले. त्या वाहनातून दोन पुरुष आणि एक महिला खाली उतरले. त्यांनी आरतीला हाक मारत संवाद साधण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांना ओळखत नसल्याने आरतीने कोणतेही उत्तर दिले नाही.यानंतर त्या महिलेने, तू मत्स्योदरी शाळेत शिकतेस का? मीदेखील त्या शाळेची शिक्षिका आहे. चल, आपण सोबत जाऊ, असे सांगत तिची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला.अनोळखी व्यक्तींवर संशय आल्याने आरतीने त्यांच्याशी संवाद टाळला दरम्यान एकाने तिला ओढण्याचा प्रयत्न केला असता तीने आरडाओरड करत तात्काळ सुटका करून घेतली. या घटनेची माहिती मिळताच बसस्थानक परिसरात कर्तव्यावर असलेले पोलीस कर्मचारी विजय केंद्रे हे तात्काळ घटनास्थळी पोहोचले. त्यांनी विद्यार्थिनीला धीर देत सुरक्षितपणे तिच्या मावशीच्या घरी सोडले.

आरतीची मावशी घरकाम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करते.मावशीचे सासू-सासरेही सोबत राहतात, तर आरतीचे आई-वडील गेवराई तालुक्यात शेतमजुरी करतात. पोलीस कर्मचाऱ्यांनी कुटुंबीयांना तक्रार दाखल करण्याचे आवाहन केले. मात्र आई- वडील गावाबाहेर असल्याने कुटुंबीयांनी सुरुवातीला तक्रार देण्याबाबत संकोच व्यक्त केल्याचे समजते. या घटनेनंतर अंबड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत परिसरातील विविध सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यास सुरुवात केली आहे. विद्यार्थिनीकडून संशयितांचे वर्णन घेण्यात आले असून चारचाकी वाहनाचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

चाणाक्षपणा आणि धाडसामुळे अपहरणाचा प्रयत्न फसला

अनोळखी व्यक्तींवर संशय आल्याने आरतीने त्यांच्याशी संवाद टाळला. त्यानंतर त्या दोघा इसमांनी तिचे घर कुठे आहे, अशी विचारणा केली.त्यावेळी प्रसंगावधान राखत आरतीने हेच माझे घर असून समोर बसलेल्या आजी माझ्याच आहेत, असे खोटे सांगितले. याच वेळी संशयितांपैकी एका इसमाने तिचा हात पकडून जबरदस्तीने वाहनात बसविण्याचा प्रयत्न केल्याचे सांगितले जाते. यावेळी घाबरून न जाता आरतीने मोठ्याने आरडाओरड करण्यास सुरुवात केली. तिचा आवाज ऐकून जवळच बसलेल्या एका वृद्ध महिलेने बाळ, इकडे ये, अशी हाक मारली. नागरिकांचे लक्ष वेधले जात असल्याचे पाहताच तिन्ही संशयितांनी वाहनातून तातडीने पलायन केले.

## २२६ वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, मोफत औषधोपचार

बीड : श्री संत गजानन महाराज पालखी सोहळ्यानिमित्त रोटरी क्लब ऑफ बीडच्या वतीने आयोजित करण्यात आलेले वारकरी आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात पार पडले. समाजसेवेच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमात २२६ वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करून त्यांच्यावर मोफत औषधोपचार करण्यात आले. तसेच आवश्यक वैद्यकीय सल्ला व आरोग्यविषयक मार्गदर्शनही देण्यात आले. पालखी मार्गावरील पायी प्रवासात वारकऱ्यांना वेळेवर आरोग्य सेवा मिळावी, या हेतूने आयोजित शिबिराला वारकरी, डॉक्टर आणि स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरासाठी निमा संघटना बीडचे अध्यक्ष डॉ. अशोक सानप, सचिव डॉ. गनंजय देशपांडे यांच्यासह डॉक्टरांच्या पथकाने दिवसभर वैद्यकीय सेवा दिली.

## तिसगाव येथील अल्पवयीन मुलीचे अपहरण करून वारंवार अत्याचार!

### पीडितेची पुणे शिरूर न्हावरा परिसरातून सुटका आरोपीविरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

पाथर्डी । प्रतिनिधी

घरात कोणी नसल्याचा फायदा घेत एका अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पीडित मुलीच्या फिर्यादीवरून संशयित आरोपीविरोधात पाथर्डी पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे मिळालेल्या माहितीनुसार ऊसतोड कामगाराचे कुटुंब कामाचा हंगाम संपल्यानंतर तालुक्यात वास्तव्यास आले होते मार्च २०२६ मध्ये मुलगी घरी एकटी असताना संशयित आरोपीने तिचे फुस लावून अपहरण केले. आरोपीने तिला अनोळखी ठिकाणी नेऊन जिवे मारण्याची धमकी देत तिच्यावर वेळोवेळी अत्याचार केला त्यानंतर तिला पुणे जिल्ह्यातील न्हावरा (शिरूर घोडनदी) परिसर येथे एका गुऱ्हाळावर कामास ठेवून तेथेही तिच्यावर धाक दाखवून अत्याचार सुरूच ठेवला यानंतर ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात पीडितेने एका अज्ञात व्यक्तीच्या मोबाईलवरून आपल्या पालकांशी संपर्क साधून स्वतःच्या ठावठिकाण्याबद्दल माहिती दिली या माहितीच्या आधारे तिच्या पालकांनी तातडीने न्हावरा येथे जाऊन तिला सुखरूप घरी आणले त्यानंतर घाबरलेल्या अवस्थेत असलेल्या मुलीने तिच्यावर घडलेला सर्व प्रकार पालकांना सांगितला पीडितेने तिच्या आईसह आणि महिला पोलीस कर्मचाऱ्याच्या समक्ष पाथर्डी पोलीस ठाण्यात हजर राहून तक्रार नोंदवली आहे या प्रकरणी पोलिसांनी संशयित आरोपी धनंजय बाबासाहेब आठरे याच्याविरोधात गुन्हा दाखल केला असून पोलीस पुढील तपास करत आहेत.

## पोलिसांनी कारवाई न केल्यामुळे अजयचा खून?

### नातेवाईकांचा आरोप ;जीव गेल्यानंतर संशयित आरोपी ताब्यात

जालना। प्रतिनिधी

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे जालन्यात खून जालना शहरातील नूतन वसाहत परिसरात २५ वर्षीय अजय विक्रम आढाव याची धारदार शस्त्राने निघृण हत्या झाल्याने शहरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या खून प्रकरणी घटना घडण्याच्या अगोदर याबाबतची माहिती पोलीस स्टेशनला व पोलिसांना कळविण्यात आले होते परंतु पोलिसांनी जाणून बुजून दुर्लक्ष केल्यामुळे सदरील खुनाची घटना घडल्याची बोलल्या जात आहे असा आरोपी नातेवाईकांनी केला आहे? मात्र या हत्येपेक्षा अधिक गंभीर बाब म्हणजे, यापूर्वी झालेल्या हल्लचाची तक्रार पोलिसांकडे करूनही प्रभावी कारवाई झाली नसल्याचा आरोप मृताच्या नातेवाईकांनी केला आहे. त्यामुळे वेळीच पोलिसांनी कठोर पावले उचलली उचलली असती, तर आज अजय जिवंत असता, असा संतप्त पोलीस प्रशासनावर नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



गुरुवारी सायंकाळी अंबड चौफुलीजवळील हनुमान मंदिर परिसरात अजय आढाववर अज्ञात हल्लेखोरांनी धारदार शस्त्राने सपासप वार केले. गंभीर जखमी अवस्थेत त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या हल्ल्यात आणखी एक युवक जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेनंतर जिल्हा सामान्य रुग्णालयात नातेवाईक, मित्रपरिवार आणि नागरिकांनी मोठी गर्दी केली. कुटुंबीयांचा आक्रोश, संतप्त प्रतिक्रिया आणि आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी यामुळे काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. नातेवाईकांच्या आरोपानुसार, तीन-चार दिवसांपूर्वीही अजयवर याच व्यक्तींनी हल्ला केला होता. त्या घटनेची तक्रार पोलिसांकडे देण्यात आली होती. तसेच, आज वाचलास, पण पुढच्या वेळी जिवंत सोडणार नाही, अशी उघड धमकीही देण्यात आली होती. तरीही संबंधितांविरुद्ध पोलीस प्रशासन काहीच कारवाई न केल्यामुळे सदरील घटना घडल्याचे दिसून येत आहे. तसेच प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली नाही. या निष्क्रियतेमुळेच आरोपींचे मनोबल वाढले आणि अखेर अजयचा जीव गेला, असा गंभीर आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या आरोपांची स्वतंत्रपणे अधिकृत पुष्टी झालेली नाही. या घटनेनंतर जिल्हा सह शहरातील कायदा व सुव्यवस्थेवर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. काही दिवसांपूर्वीपर्यंत अवैध धंद्यांवर धडक कारवायांमुळे निर्माण झालेला पोलिसांचा धाक आता कमी झाल्याची दिसून येत आहे सदरील प्रकरणी जिल्ह्याचे पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी पोलीस प्रशासनावर तत्काळ लक्ष देणे गरजेचे आहे अशी मागणी सामान्य नागरिकाकडून करण्यात येत आहे.


जाहीर प्रगटन

मा. के.के पाटील सह दिवाणी न्यायधीश व.स्तर बीड यांच्या न्यायालयात.

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ९५१ /२०२६.

ॲड.जी.एस.घुगे

काशीबाई भ्र किसन गाताडे विरुद्ध निरंक

अर्जदार: (१) काशीबाई भ्र. किसन गाताडे, वय ८३ वर्षे, धंदा घरकाम, रा. मु.पो. तालखेड ता. माजलगाव जि. बीड. ह. मु. सुर्डी थोट पो. परभणी ता. जि. बीड. (२) बंडु पि. किसन गाताडे, वय ६० वर्षे, धंदा. शेती रा. सुर्डी पो. परभणी ता. जि. बीड. (३) सतिश पि. किसन गाताडे/गायकवाड वय-६२ वर्षे, धंदा शेती. रा. नामदेव नगर बोरी परभणी ता. जि. बीड. (४) मनोहर पि. किसन गाताडे, वय- ५५ वर्षे, धंदा शेती रा. मु.पो. तालखेड ता. माजलगाव जि. बीड. (५) प्यारन पि. किसन गाताडे, वय ५८ वर्षे, धंदा घरकाम रा. मु. पो. तालखेड ता. माजलगाव जि. बीड. ह. मु. सुर्डी थोट पो. परभणी ता. जि. बीड.

गैर अर्जदार विरुद्ध निरंक

प्रकरण,:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी मयत नामे किसन बाबुराव गाताडे हे दिनांक २६/०८/२०१३रोजी राहते घरी मु. सुर्डी पोस्ट परभणी ता. जि. बीड येथे मयत झालेले असून अर्जदार क्र हि मयत किसन बाबुराव गाताडे यांची पत्नी असुन अर्जदार क्र २ ते ४ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क्र ५ ही मुलगी आहे हे महत्त्वाचे कायदेशीर वारस आहे. वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरिता व इतर कार्यालयीन वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. मयताचे वारस नव्हेत आसे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आज या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदर अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन. त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरहू मयत किसन बाबुराव गाताडे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी आज दिनांक २०/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख १०/०८/२०२६

स्वाक्षरीत
कनिष्ठ लिपिक

स्वाक्षरीत
आदेशावरून
अधीक्षक
सह दिवाणी न्यायालय व स्तर बीड



जाहिर प्रगटन

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६
जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१६६७
दिनांक - २६/१२/२०२५

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती **मुजंम्मिल मकबुल शेख** रा. अंबड ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या **मुलाच्या** जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | जिशान मुजंम्मिल शेख | मुलगा | २३/०९/२०१२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-/ /२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड



जाहिर प्रगटन

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६
जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१६६६
दिनांक - २६/१२/२०२५

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती **मुजंम्मिल मकबुल शेख** रा. अंबड ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या **मुलाच्या** जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | आहिल मुजंम्मिल शेख | मुलगा | २३/०६/२०१४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-/ /२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड


## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी राहुल लोणीकर

### उपाध्यक्षपदी निर्मला मरकड यांची बिनविरोध निवड



जालना । प्रतिनिधी

जिल्हा मध्यवर्ती बँकेची आर्थिक ताकद अधिक वाढविण्यासाठी सर्व सहकारी साखर कारखाने, विविध सहकारी संस्था तसेच जिल्हा परिषदेची खाती टप्प्याटप्प्याने जिल्हा मध्यवर्ती बँकेकडे वळविण्यासाठी प्रयत्न केले जातील, अशी घोषणा केली. जिल्ह्यातील सहकार चळवळीला अधिक बळकटी देण्यासाठी सर्व संस्थांनी आपल्या आर्थिक व्यवहारासाठी जिल्हा बँकेवर विश्वास ठेवावा, असे आवाहन त्यांनी केले. या निर्णयामुळे बँकेच्या आर्थिक व्यवहारात मोठी वाढ होऊन शेतकरी, सभासद आणि सहकारी संस्थांना अधिक सक्षम आर्थिक सेवा उपलब्ध होतील, असा विश्वास माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी व्यक्त केला. दि. ५ ऑगस्ट २०२६ रोजी दि जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची निवडणूक अत्यंत खेळीमेळीच्या, सौहार्दपूर्ण आणि सर्वानुमते वातावरणात पार पडली. बँकेच्या सर्व सन्माननीय संचालकांनी अध्यक्षपदी राहुल बबनराव लोणीकर तर उपाध्यक्षपदी मा. सौ. निर्मलाताई दिपकराव मरकड यांची बिनविरोध निवड केली. जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रातील ही निवड ऐतिहासिक मानली जात असून, सर्वपक्षीय नेतृत्वाने एकत्र येत बँकेच्या विकासाला प्राधान्य दिल्याचे चित्र या निवडीतून स्पष्ट झाले. नव्या नेतृत्वाकडून बँकेच्या प्रगतीला नवी दिशा मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

निवड प्रक्रियेवेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, आमदार तथा माजी मंत्री बबनराव लोणीकर, आमदार अर्जुनराव खोतकर, माजी आमदार राजेश टोपे, आमदार नारायणराव कुचे, संतोष दानवे, कैलास गोरंट्याल माजी आमदार अरविंदराव चव्हाण माजी आमदार शिवाजीराव चोथे, यांच्यासह सर्व संचालक, संचालिका व मान्यवर उपस्थित होते. अध्यासी अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था विष्णु रोडगे यांनी, तर कार्यकारी संचालक आशुतोष देशमुख यांनी निवड प्रक्रियेचे कामकाज यशस्वीरीत्या पार पाडले. यावेळी बोलताना आमदार अर्जुनराव खोतकर यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती जालना तसेच जिल्ह्यातील सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांची खाती जिल्हा मध्यवर्ती बँकेकडे वळविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे जाहीर केले. जिल्ह्याच्या प्रगतीसाठी सर्वपक्षीय सहकार्याची ही भावना भविष्यातही कायम ठेवत बँकेला नवे वैभव प्राप्त करून देण्यासाठी एकजुटीने काम करू, असा विश्वास आमदार अर्जुन खोतकर यांनी व्यक्त केला. निवडीनंतर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. जिल्ह्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले शेतकरी, हितचिंतक, सहकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी नवनिर्वाचित अध्यक्ष राहुल लोणीकर व उपाध्यक्ष निर्मलाताई मरकड यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.


जाहिर प्रगटन

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६
जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-११४३
दिनांक - ०६/०८/२०२६

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती **जालिंदर अंबादास वजीर** रा. रेवलगाव ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या **मुलीच्या** जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | मोहिनी जालिंदर वजीर | मुलगी | ३०/०५/२०१२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०६/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड



जाहिर प्रगटन

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६
जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-११४२
दिनांक - ०६/०८/२०२६

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती **जालिंदर अंबादास वजीर** रा. रेवलगाव ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या **मुलाच्या** जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | अभिषेक जालिंदर वजीर | मुलगा | ११/०७/२०१४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-०६/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड



जाहिर प्रगटन

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड

दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६
जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१६६५
दिनांक - २६/१२/२०२५

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती **मुजंम्मिल मकबुल शेख** रा. अंबड ता. अंबड जि.जालना यांनी यांच्या **स्वतःच्या** जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १. | मुजंम्मिल मकबुल शेख | स्वतः | १२/०१/१९८८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक-/ /२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

स्वाक्षरित
तहसिलदार तथा कार्यकारी
दंडाधिकारी, अंबड

# घुले कुटुंबीयांच्या आंदोलनाला नवे वळण; इमारतीवर चढून आंदोलन

## जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात तणाव; प्रशासनाचे समजूत काढण्याचे प्रयत्न

बीड । प्रतिनिधी

विलास घुले हत्या प्रकरणात न्याय मिळावा, या मागणीसाठी बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेल्या घुले कुटुंबीयांच्या आमरण उपोषणाला शनिवारी नवे वळण मिळाले. आंदोलनाची दखल घेऊन तातडीने निर्णय घ्यावा, या मागणीसाठी विलास घुले यांच्या पत्नी सुषमा घुले यांचे भाऊ जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील इमारतीवर चढून आंदोलन करू लागले. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस आणि महसूल प्रशासनातील अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. संबंधित व्यक्तीशी संवाद साधून त्यांची समजूत काढण्याचे प्रयत्न करण्यात आले. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. घटनास्थळी मोठ्या संख्येने नागरिक आणि आंदोलनकर्ते जमा झाल्याने काही काळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली.





विलास घुले हत्या प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करून प्रकरणाचा निष्पक्ष तपास करावा, या मागणीसाठी घुले कुटुंबीय गेल्या तीन दिवसांपासून आमरण उपोषण करत आहेत. उपोषणादरम्यान कुटुंबीयांनी विविध स्तरांवर निवेदने देत न्यायाची मागणी केली असून, प्रशासनाकडून ठोस निर्णयाची अपेक्षा व्यक्त केली आहे.

दरम्यान, आंदोलनाची तीव्रता वाढत असल्याने प्रशासनाने परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस यंत्रणा सतर्क असून, आंदोलनकर्त्यांशी सातत्याने संवाद सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### आंदोलनाला नवे वळण

उपोषण सुरू असतानाच सुषमा घुले यांचे भाऊ जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील इमारतीवर चढल्याने आंदोलनाला नवे वळण मिळाले. या घटनेनंतर पोलीस आणि महसूल अधिकाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न केले.

### कुटुंबीयांची मागणी

विलास घुले हत्या प्रकरणाचा निष्पक्ष तपास करून संबंधित आरोपींवर तातडीने कायदेशीर कारवाई करावी, अशी घुले कुटुंबीयांची मागणी आहे. मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याची भूमिका त्यांनी कायम ठेवली आहे.

# आपल्या मुलांच्या भविष्यासाठी आता एकजुटीची वेळ- वाघमारे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अनुसूचित जमातीच्या जात पडताळणी प्रक्रियेदरम्यान आदिवासी कोळी महादेव, मल्हार कोळी जमातीतील अनेक नागरिकांना गेल्या अनेक वर्षांपासून विविध अडचणी व अन्यायाचा सामना करावा लागत असल्याची भावना समाजात व्यक्त होत आहे. या प्रश्नांकडे शासन व संबंधित यंत्रणांचे गांभीर्याने लक्ष वेधण्यासाठी सोमवार, दिनांक १० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी दहा वाजता अनुसूचित जमाती जात पडताळणी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे लोकशाही मार्गाने ''टाळे ठोको आंदोलन'' आयोजित करण्यात आले आहे.



या आंदोलनात मराठवाड्यातील आदिवासी कोळी महादेव, मल्हार कोळी जमातीतील सर्व बांधव, माता-भगिनी, युवक, विद्यार्थी तसेच समाज हिताची जाणीव असलेल्या नागरिकांनी हजारोंच्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कोळी राष्ट्रसंघ चे महाराष्ट्र अध्यक्ष बळीराजे वाघमारे यांनी केले आहे.

बळीराजे वाघमारे म्हणाले की, समाजाच्या न्याय प्रश्नावर लोकशाही मार्गाने आवाज उठवणे हा प्रत्येक नागरिकाचा घटनात्मक अधिकार आहे. त्यामुळे सर्व समाज बांधवांनी शांतता, शिस्त आणि एकजूट राखत आंदोलनात सहभागी होऊन आपल्या हक्कांसाठी सामूहिकपणे आवाज बुलंद करावा. समाजाच्या न्याय मागण्यांचा शासनाने गांभीर्याने विचार करून

पान ३ वर

# सुनेत्राताईंच्या सन्मानासाठी राष्ट्रवादी मैदानात; हर्षवर्धन सपकाळ यांच्या निषेधार्थ हजारोंचा एल्गार!

## बीड शहर राष्ट्रवादी काँग्रेसकडून तीव्र निषेध; बशीरगंज चौकात जोरदार आंदोलन

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राताई अजितदादा पवार यांच्याविरोधात काँग्रेस पक्षाच्या नेत्यांकडून करण्यात आलेल्या बेताल, अशोभनीय व महिलांचा अवमान करणाऱ्या वक्तव्याच्या निषेधार्थ बीड शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आज बशीरगंज चौक येथे जोरदार निषेध आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात नगरपालिकेच्या सभापती आरतीताई बनसोडे, नगरसेविका रेश्माताई सरवदे, नगरसेविका मीनाताई गोडसे, नगरसेविका सीताताई मोरे, नगरसेविका नुझत आरा शहबाज शेख, पठाण रेहाना भाभी यांच्यासह महिलांची लक्षणीय उपस्थिती राहिली.




**महिला नगरसेविकांसह महिलांची लक्षणीय उपस्थिती; घोषणाबाजीने बशीरगंज परिसर दणाणला**

महिलांच्या सन्मानासाठी महिलांनी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरून काँग्रेसच्या बेताल वक्तव्याचा निषेध नोंदवला. त्यामुळे या आंदोलनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. यावेळी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अमर नाईकवाडे, बीड नगर परिषदेचे उपाध्यक्ष विनोद मुळूक आणि गटनेते फारूक पटेल, तालुकाध्यक्ष ॲड राजेंद्र राऊत, नगरसेवक अशफाक इनामदार, नगरसेवक प्रमोद शिंदे, भैय्यासाहेब मोरे, मनोज गोडसे गोडसे, शेख खलील, रामदास सरवदे, रणजीत बनसोडे, यांनी काँग्रेसच्या या वक्तव्याचा तीव्र शब्दांत निषेध केला. यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, ''लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून तत्कालीन अर्थमंत्री आणि आमचे नेते मा. अजितदादा पवार यांनी महाराष्ट्रातील लाखो महिलांना आर्थिक आधार देत त्यांच्या सन्मानात भर घातली. महिलांना सक्षम करण्याचे आणि त्यांचा सन्मान करण्याचे काम अजितदादांनी केले.'' स्वर्गीय अजितदादांनी महिलांचा सन्मान करण्याची जी शिकवण आणि संस्कार आम्हाला दिले, त्याच विचारांच्या आणि त्यांनी दाखवलेल्या मार्गावरच बीड शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचं मार्गक्रमण सुरू आहे. महिलांचा सन्मान हा आमच्यासाठी केवळ राजकीय मुद्दा

पान ३ वर

# मराठा आरक्षणाबाबत निर्णय दुरुस्त करा; अन्यथा निवडणुकीत उत्तर देऊ -जरांगे पाटील

## बीडमध्ये पत्रकार परिषद; बावनकुळे यांच्या भूमिकेवर टीका

बीड । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी बीड येथे पत्रकार परिषद घेऊन राज्य सरकार आणि भारतीय जनता पक्षावर टीका केली. मराठा समाजाशी संबंधित निर्णयांमध्ये तातडीने दुरुस्ती करावी, अन्यथा आगामी निवडणुकांमध्ये भाजपच्या उमेदवारांना पराभूत करण्यासाठी मराठा समाज प्रयत्न करेल, असा इशारा त्यांनी दिला.



मराठा आंदोलनाचे नेते जरांगे पाटील शुक्रवारी बीड येथे आले असता हॉटेल नीलकमल या ठिकाणी पत्रकार परिषदेत बोलताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कुणबी नोंदी रद्द करण्याबाबत पत्र दिल्याचा आरोप केला. गेल्या अनेक दशकांत कोणत्याही मराठा नेत्याने किंवा मंत्र्याने ओबीसी आरक्षण अथवा कुणबी नोंदी रद्द करण्याची मागणी केली नव्हती, असा दावा त्यांनी केला. या संदर्भातील निर्णय आणि भूमिका सरकारने तातडीने दुरुस्त करावी, अशी मागणी त्यांनी केली.

मराठा समाजाच्या आरक्षणावर अथवा कुणबी नोंदींवर परिणाम करणारे कोणतेही पाऊल

पान ३ वर




बीड : मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष , बीड जिल्हा प्रमुख पदी नियुक्ती झाल्याबद्दल डॉ सुधीर राऊत यांचा सत्कार करतांना सुहास पाटील व त्यांचे सहकारी

# बीडकरांना स्वच्छ व नियमित पाणीपुरवठ्यासाठी तातडीने उपाययोजना करा -आ.संदीप क्षीरसागर

## मुख्याधिकाऱ्यांसमवेत आढावा बैठक; एमएसईबी थकबाकी भरून नवीन योजनेला वीज जोडणी देण्याची सूचना

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील नागरिकांना स्वच्छ, नियमित आणि पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी तातडीने आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, अशा सूचना आमदार संदीप क्षीरसागर यांनी बीड नगर परिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडूरके यांच्यासमवेत झालेल्या आढावा बैठकीत दिल्या. पाणीपुरवठा, जलशुद्धीकरण प्रकल्प, नवीन पाणी योजना आणि पाईपलाईन गळती या विषयांचा बैठकीत सविस्तर आढावा घेण्यात आला.



बैठकीत शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या सर्व जलशुद्धीकरण प्रकल्पांतून नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी पुरविण्यावर भर देण्यात आला. नागरिकांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड होऊ नये, यासाठी पाण्याच्या गुणवत्तेबाबत आवश्यक दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.

शहरासाठी राबविण्यात येत असलेल्या नवीन पाणीपुरवठा योजनेअंतर्गत आवश्यक पाईपलाईनची कामे पूर्ण झाली आहेत. मात्र, नगर परिषदेची महावितरणकडे असलेली मोठ्या प्रमाणातील थकबाकी असल्यामुळे योजनेला विद्युत जोडणी मिळण्यास विलंब होत असल्याचे

पान ३ वर

# महादेव मुंडे हत्या प्रकरण : पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी परळीत कुटुंबीयांची घेतली भेट

## तपासाची माहिती जाणून घेत आरोपीला तातडीने अटक करण्याची कुटुंबीयांची मागणी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेले राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी परळी वैद्यनाथ येथे जाऊन महादेव मुंडे हत्या प्रकरणातील कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी कुटुंबीयांनी आरोपीला तातडीने अटक करून तपासाला गती द्यावी, अशी मागणी पोलीस महासंचालकांकडे केली.

महादेव मुंडे यांचे मेहुणे सतीश फड यांनी दाते यांच्यासमोर प्रकरणाची सविस्तर माहिती मांडली. हत्या प्रकरणातील तपास जलदगतीने पूर्ण करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच आरोपीला तातडीने अटक करून कुटुंबाला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. यावेळी कुटुंबीयांनी तपासातील विविध बाबींकडे पोलीस महासंचालकांचे लक्ष वेधत प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची अपेक्षा व्यक्त केली. तपासात कोणताही विलंब होऊ नये आणि दोषींवर कायद्यानुसार कठोर



पान ३ वर

# शहरातील नाली बांधकाम, माजलगाव-तेलगाव रस्ता व धारूर घाट रुंदीकरण कामांचा आ.सोळंकेनी घेतला आढावा

माजलगाव । प्रतिनिधी

राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८- सी पॅकेज अंतर्गत माजलगाव ते केज दरम्यान प्रस्तावित असलेल्या विविध विकासकामांच्या अनुषंगाने दि ०७ ऑगस्ट शुक्रवार रोजी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत आ. प्रकाश सोळंके यांनी आढावा बैठक घेतली.

राष्ट्रीय महामार्ग क्र.५४८- सी हा माजलगाव शहरातून जात असल्याने मुख्य रस्त्यालगतच्या नाल्यांचा प्रश्न शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शहरातील नाल्यांचे सर्वेक्षण करून पाण्याचा योग्य एक्झिट पॉइंट निश्चित करण्यात आला आहे. तसेच नाली बांधकामासाठी आवश्यक असलेली ८ फूट रुंदीची जागा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित



अधिकाऱ्यांना सूचना करण्यात आल्या.या कामामुळे पावसाळ्यातील पाणी साचण्याच्या समस्येवर प्रभावी उपाय होण्यासोबतच वाहतुकीची कोंडी कमी होऊन नागरिकांना तसेच व्यापाऱ्यांना दिलासा मिळेल आणि पार्किंगचीही अधिक सोयीस्कर व्यवस्था निर्माण होईल.धारूर घाटाच्या

पान ३ वर

# मंडल आयोगाच्या अंमलबजावणीमुळे ओबीसी व भटके - विमुक्त समाजाला सामाजिक न्याय आणि सन्मानाचे हक्क मिळाले -ॲड. सुभाष राऊत

बीड । प्रतिनिधी

मंडल आयोगाच्या अंमलबजावणीसाठी आदरणीय ना. छगनरावजी भुजबळ साहेब, स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे, माजी खासदार समीरभाऊ भुजबळ आणि माजी आमदार डॉ. नारायणराव मुंडे यांच्या योगदानाचा विशेष उल्लेख करत, मंडल आयोगाच्या अंमलबजावणीमुळे ओबीसी व भटके-विमुक्त समाजाला न्याय मिळाल्याचे अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांनी सांगून मंडल आयोगाच्या अंमलबजावणीसाठी विविध नेत्यांनी केलेल्या संघर्षाचा गौरव केला. सामाजिक न्यायाच्या लढ्यासाठी मंडल स्तंभ प्रेरणादायी केंद्र राहील, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

मंडल आयोग लागू दिनानिमित्त धुळे - सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील मौजे दोदडगाव (ता. अंबड, जि. जालना) येथे ओबीसी, भटके - विमुक्त समाजाचे प्रेरणास्थान असलेल्या मंडल स्तंभ स्मारकास अभिवादन करण्यात आले. मंडल स्तंभ स्मारक समितीच्या वतीने आयोजित या कार्यक्रमास विविध सामाजिक, शैक्षणिक व समता चळवळीतील मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमास मंडल स्तंभ निर्माते, ओबीसी चळवळीचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार डॉ. नारायणरावजी मुंडे, मंडल स्तंभ स्मारक समितीचे अध्यक्ष प्रा. सत्संग मुंडे, अखिल भारतीय समता परिषदेचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत, प्रदेश संघटक प्रा. रवींद्र खरात, समितीचे सदस्य सुघोष मुंडे, दोदडगावचे सरपंच बंडू मुंडे, रणजीत बांगर, भानुदास केकान, रामकिसन घुगे, महारुद्र केकान, सुभाष चाटे, बटुळे मामा, अनुज चेपटे, बाळासाहेब पांढरे यांच्यासह पंचक्रोशीतील असंख्य समाजबांधव उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मंडल स्तंभ स्मारकास अभिवादन करून करण्यात आली. प्रास्ताविकात मंडल स्तंभ स्मारक समितीचे अध्यक्ष प्रा. सत्संग मुंडे यांनी मंडल स्तंभ उभारणीमागील भूमिका स्पष्ट केली. ओबीसी, भटके - विमुक्त समाजाला सामाजिक, राजकीय आणि प्रशासकीय क्षेत्रात न्याय्य प्रतिनिधित्व मिळावे, संविधानाने दिलेले अधिकार प्रभावीपणे प्राप्त व्हावेत आणि सामाजिक न्यायासाठी संघर्षाची प्रेरणा मिळावी, या उद्देशाने मंडल स्तंभाची निर्मिती करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यातही हा स्तंभ सामाजिक न्यायाच्या चळवळीस प्रेरणा देत राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अखिल भारतीय समता परिषदेचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांनी आपल्या मनोगतात मंडल आयोगाच्या अंमलबजावणीसाठी विविध नेत्यांनी केलेल्या संघर्षाचा गौरव केला. त्यांनी आदरणीय मा.ना.छगनरावजी भुजबळ साहेब, स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे, माजी खासदार समीरभाऊ भुजबळ

पान ३ वर



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26